बुधवार, 18 मे 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 259
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी


● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 18 MAY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-259 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

## एटीएसची मोठी कारवाई; १९९३ मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी चौघांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदाबाद :** मुंबईत १९९३ साली झालेल्या साखळी बॉम्बस्फोटप्रकरणी गुजरात एटीएसला मोठे यश आले आहे. गुजरात एटीएसने या प्रकरणी चार जणांना अटक केली आहे. पोलिसांनी या चार आरोपींची छायाचित्रेही प्रसिद्ध केली आहेत.

मुंबई बॉम्बस्फोटानंतर चारही आरोपी परदेशी पळून जाण्यात यशस्वी झाले होते. त्यानंतर बनावट पासपोर्ट तयार करुन ते पुन्हा भारतात आले आणि गुजरातमधील अहमदाबाद येथे राहत होते. गुजरात एटीएसला अबू बकर, शोएब बाबा आणि सैयद कुरैशी, युसुफ भटाका यांना पकडण्यात यश आले आहे. मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील हे चारही आरोपी बनावट पासपोर्टच्या सहाय्याने एका देशातून दुसऱ्या देशात फिरत होते. काही दिवसांपूर्वी एटीएसला हे चारही जण दुबईत असल्याची खबर मिळाली. त्यानंतर हे चारही जण अहमदाबाद येथे



येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर एटीएसने सापळा रचन या चौघांना अहमदाबाद विमानतळाबाहेर अटक केली.

आरोपींनी १९९३च्या साखळी बॉम्बस्फोटानंतर अन्य स्फोटकेही जमा केली होती. तसंच, या चौघांचेही दाऊदच्या गँगसोबत संबंध असल्याचे मानले जाते. त्यामुळे या चौघांच्या अटकेनंतर डी- कंपनीशी संबंधित अनेक खुलासे समोर येण्याची शक्यता आहे. दरम्यान, हे चारही जण अहमदाबाद ला का आले होते याची चौकशी अधिकाऱ्यांकडून होत आहे.

**साखळी बॉम्बस्फोटात २५० जणांचा मृत्यू**

अबू बकर, युसुफ भटाका, शोएब बाबा आणि सैयद कुरेशी यांनी गुप्तचर यंत्रणेना गुंगारा देण्यासाठी आपले घराचे पत्ते बदलले होते. त्यांच्या पासपोर्टवर देण्यात आलेली सर्व माहिती खोटी होती. १२ मार्च १९९३मध्ये मुंबईत १२ साखळी बॉम्बस्फोट घडवून आणले होते. यात २५० हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. तर, ८०० जण गंभीर जखमी झाले होते.

## छत्रपती संभाजीराजेंना मोठा धक्का

### राज्यसभेसाठी शिवसेना सहावा उमेदवार देणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्यसभेसाठी शिवसेना सहावा उमेदवार देणार असल्याची घोषणा शिवसेनेचे नेते तथा परिवहन मंत्री अनिल परब यांनी केली आहे. शिवसेनेच्या घोषणेने संभाजीराजेंना मोठा धक्का बसला आहे. कारण राज्यसभेवर निवडून जाण्यासाठी सर्वपक्षीयांनी मला मदत करावी, असे आवाहन मागील आठवड्यात संभाजीराजेंनी केले होते. त्यांच्या आवाहनाला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रतिसाद दिला होता. पण आज मंत्री परब यांनी राज्यसभेसाठी शिवसेना सहावा उमेदवार देणार असल्याची घोषणा करुन संभाजीराजेंच्या राज्यसभेच्या वाटेत काटे पेरले आहेत.**

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह १५ राज्यातील राज्यसभेवर रिक्त होणाऱ्या ५७ खासदारांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यात महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सहा जागांसाठी येत्या १० जून रोजी मतदान होणार आहे. राज्यसभेतून भाजपचे पीयूष गोयल, विनय सहस्त्रबुद्धे आणि विकास महात्मे तर शिवसेनेचे संजय राऊत, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल आणि काँग्रेसचे पी. चिदंबरम असे सहा सदस्य ४ जुलै रोजी निवृत्त होत आहेत. या रिक्त होणाऱ्या जागांसाठी निवडणूक पार पडणार आहे. मात्र बदललेल्या राजकीय समीकरणानुसार आणि महाराष्ट्र विधानसभेतील संख्याबळ लक्षात घेता भाजपचे दोन उमेदवार तर शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादीचा एक उमेदवार राज्यसभेवर निवडून जाऊ शकतो. तत्पूर्वी, उर्वरित सहाव्या जागेसाठी शिवसेनेने दावा सांगितला आहे.

शिवसेनेचा दुसरा उमेदवार, संभाजीराजेंची मोठी अडचण राज्यसभेसाठी शिवसेना दोन उमेदवार उभे करणार आहे. संजय राऊत यांची फेरनिवड जवळपास निश्चित मानले जात आहे. त्यात आता परब यांच्या घोषणेने शिवसेनेचा दुसरा उमेदवार कोण याबाबतचा सस्पेन्स वाढला आहे.

**संभाजीराजेंना पाठिंबा देण्यावरुन आघाडीत किंतु परंतु**

शिवसेनेच्या निर्णयाने संभाजीराजेंची मोठी अडचण होण्याची शक्यता आहे. आपण अपक्ष म्हणून राज्यसभेत जाणार आहोत, त्यासाठी मला सर्वपक्षीयांनी मदत करावी, असे आवाहन संभाजीराजेंनी केले आहे. मात्र त्यांची उमेदवारी भाजपच्या रणनीतीचा भाग असू शकते, असा अंदाज महाविकास आघाडीतील नेत्यांचा आहे. त्यामुळे संभाजीराजेंना पाठिंबा देण्यासाठी महाविकास आघाडीत किंतु परंतु आहेत.

#### आकड्यांचे गणित...!

सध्या महाविकास आघाडीकडे १६९ आमदार आहेत. शिवसेना ५५, राष्ट्रवादी ५४, काँग्रेस ४४, इतर पक्ष ८ आणि अपक्ष ८ असे महाविकास आघाडीकडे संख्याबळ आहे. तर भाजपकडे ११३ आमदारांचे संख्याबळ आहे. भाजपचे १०६ आमदार, रासप १, जनसुराज्य १ आणि अपक्ष ५ आमदार अशा एकूण ११३ आमदारांचे वजन भाजपकडे आहे. महाविकास आघाडीकडे १६९ आमदार आणि भाजपकडे ११३ आमदार आहेत.



## पाऊस नाही तिथे निवडणुका घेण्यास हरकत काय?

### सर्वोच्च न्यायालयाचा निवडणूक आयोगाला सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसंदर्भात आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने जिथे पाऊस नाही तिथे निवडणुका घ्यायला काय हरकत आहे?, असा सवाल निवडणूक आयोगाला केला आहे.

राज्य निवडणूक आयोगाने सप्टेंबर महिन्यात महापालिका, जिल्हा परिषद आणि नगरपंचायती निवडणूका घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात अर्ज केला होता. मात्र, महाराष्ट्र सरकारने पावसाळ्याचे कारण देत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आणखी वेळ हवा असल्याचे म्हटले होते. पण, राज्य निवडणूक आयोगाने कोणतीही सल्लामसलत न करता सर्वोच्च न्यायलयात अर्ज दाखल केल्याने आघाडी सरकार नाराज असल्याची चर्चा होती. त्यामुळे आज सर्वोच्च न्यायालयात काय घडते याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले होते.

जिथे कमी पाऊस पडतो तिथे निवडणूका घ्यायला काय हरकत आहे, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केला आहे. तसेच, राज्यातील जिल्हानिहाय आढावा घेऊन राज्य निवडणूक आयोगाने एक रचना तयार करावी, असे मत सर्वोच्च न्यायालयाने मांडले आहे. यावर निवडणूक आयोग काय भूमिका घेते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या अर्जात राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात घेण्यात याव्यात, असे म्हटले आहे. मात्र, राज्य सरकारने जुन ते सप्टेंबरमध्ये पावसाचे कारण देत निवडणूका न घेण्याचे सुचवले होते. मात्र आता सर्वोच्च न्यायालयाने जिथे पावसाची अडचण नाही तिथे निवडणूका घेण्यास काय हरकत आहे, असे कोर्टाने सुचवले आहे. मुंबई व कोकण विभागात जुन ते सप्टेंबरमध्ये पाऊसाचे प्रमाण जास्त असते. मात्र, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण त्या तुलनेत कमी असते त्यामुळे विदर्भ, मराठवाड्यात सप्टेंबरमध्ये निवडणुका होण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाने राज्यनिहाय आढावा घेऊन त्यानुसार निवडणुकांबाबत रचना करावी, असेही मत नोंदवले आहे.




## श्रीलंकेत एक दिवस पुरेल इतकाच इंधनसाठा

आधुनिक केसरी न्यूज

**कोलंबो :** मागील काही काळापासून श्रीलंका विविध प्रकारच्या आर्थिक संकटांचा सामना करत आहे. प्रचंड महागाईसह देशात अन्नाचा तुटवडा निर्माण झाला आहे. एकच दिवस पुरेल इतका इंधनसाठा शिल्लक असल्याची माहिती काल श्रीलंकेचे पंतप्रधान रानिल विक्रमसिंघे यांनी दिली आहे. यानंतर आज श्रीलंकेतील अनेक पेट्रोल पंपावर 'नो पेट्रोल'च्या पाट्या लावण्यात आल्या आहेत. पेट्रोल मिळेल या आशेने नागरिकांनी अनेक किलोमीटरपर्यंत रांगा लावल्या आहेत. इंधन तुटवड्याचे भीषण वास्तव सांगणारे अनेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. श्रीलंकेचे पंतप्रधान रानिल विक्रमसिंघे यांनी काल राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात म्हटले की, देशात केवळ एक दिवस पुरेल इतकाच इंधनसाठा शिल्लक आहे. तेलाच्या तीन शिपमेंट आयात करण्यासाठी लागणारे डॉलर्सही सरकार जमा करू शकत नाही. तेलाची जहाजे पेमेंटसाठी कोलंबो बंदराबाहेर वाट पाहत आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## गाळप पूर्ण होईपर्यंत साखर कारखाने सुरु राहतील : मुख्यमंत्री ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात मोठ्या प्रमाणावर उसाचे क्षेत्र असल्याने गाळपाचा प्रश्न निर्माण झाला आहे. हंगाम संपत आला तरी अद्याप काही जिल्ह्यामध्ये ऊस शिल्लक आहे. त्यानंतर शेतकऱ्यांचा संपूर्ण ऊस गाळप होईपर्यंत साखर कारखाने सुरु राहतील, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले आहे. 1 मे नंतर गाळप झालेल्या अतिरिक्त ऊस गाळपासाठी 200 रुपये प्रति टनप्रमाणे अतिरिक्त ऊस गाळप अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात यावर्षी ऊसाचे उत्पादन अधिक झाले असून, मागील हंगामाच्या तुलनेत 2.25 लाख हेक्टर ऊस क्षेत्र जास्त आहे. अनेक शेतकऱ्यांचा ऊस गाळप शुल्क आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी संपूर्ण ऊस गाळप होईपर्यंत साखर कारखाने सुरु ठेवावे, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बैठकीत दिले.


शेतकऱ्यांच्या हितासाठी 1 मे नंतर गाळप झालेल्या सर्व ऊसाला अतिरिक्त ऊस गाळप अनुदान म्हणून रुपये 200 प्रती टनप्रमाणे अतिरिक्त ऊस गाळप अनुदान देण्याचा निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. आज सह्याद्री



अतिथीगृह येथे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली अतिरिक्त ऊस गाळप अनुदान आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, कृषीमंत्री दादाजी भुसे उपस्थित होते.

यामुळे सुमारे 100 कोटी रुपयांचा वित्तीय भार पडणार असून राज्यात 1 मे 2022 नंतर हंगाम संपेपर्यंत अंदाजे 52 लाख टन गाळप अपेक्षित आहे. यापैकी आजअखेर 32 लाख टन गाळप झाले आहे. तसेच 1 मे 2022 नंतर गाळप होणाऱ्या व 50 किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावर वाहतूक होणाऱ्या साखर आयुक्तांनी अनिवार्य ऊस आदेश काढलेल्या ऊसास प्रतीटन पाच रुपये प्रती किलोमीटर वाहतूक अनुदान देण्यात येणार आहे. गाळप हंगाम 2021-22 मध्ये राज्यात एकूण 13.67 लाख हेक्टर क्षेत्रावर ऊस उपलब्ध आहे. 2020-21-मध्ये 11.42 लाख हेक्टर क्षेत्र ऊस पिकाखाली होते. मागील हंगामाच्या तुलनेत 2.25 लाख हेक्टर ऊस क्षेत्र अधिक आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# लावण्याचा गाभा : पं. शिवकुमार शर्मा

आधुनिक केसरी

हे सगळं जग जाणतं. गाणं आणि लता मंगेशकर या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू झाल्या. लता नावाची ही सुरांची वेल गगनाला जाऊन पोहोचली आणि रसिक त्या सुरांच्या वर्षावात चिंब न्हाऊन निघाले. पं शिवकुमार यांच्या वडिलांनीही त्यांच्या हातात संतूर हे वाद्य दिलं आणि हे वाद्य तू शिक, लोकप्रिय कर असंच जणू सांगितलं. पंडितजींनी वडिलांची आज्ञा शिरोधार्य मानून संतूरच्या तारांवरून हात फिरवायला सुरुवात केली आणि संतूरमधून शुद्ध, निर्मळ सुरांच्या लडींची बरसात होऊ लागली. रसिक त्यात चिंब भिजले.

लता दीदी सुमारे साडेसात दशकं गात होत्या आणि पंडितजींची संगीत कारकीर्दही जवळपास तेवढीच. दोघांनीही संगीत जगभर पोहोचवलं. दोघंही श्रेष्ठ कलाकार. एकाच्या गळ्यात जादू तर दुसऱ्याच्या हातात. सूर दीदींच्या गळ्यात सौंदर्य घेऊन बाहेर पडत तर शिवकुमारजींच्या संतूरमधून ते सौंदर्य घेऊन प्रकटत. सुरांचा वर्षाव रसिकांवर सारखाच व्हायचा. अंगावर प्राजक्ताचा सडा पडावा, सगळं वातावरण त्या सुरांच्या सुगंधांनी मोहरून जावं तशी जादू व्हायची. श्रोते मंत्रमुग्ध व्हायचे.

मी संगीताचा जाणकार नाही. शास्त्रीय संगीत तर मला अजिबात कळत नाही. पण जे मंत्रमुग्ध करतं, सगळं विसरून जायला लावतं ते संगीत उत्तम असं मला वाटतं. मग त्यासाठी संगीताचे जाणकार असण्याची आवश्यकता नाही. या सगळ्या महान कलाकारांच्या संगीतात ती जादू होती. ते ऐकताना मनुष्य देहभान विसरून जायचा. म्हणूनच संगीत हे आपल्याला परमेश्वराशी जोडतं. पं शिवकुमारजी म्हणायचे की संगीत केवळ करमणुकीसाठी नाही. ते आपल्या आत्म्याला परमात्म्याशी जोडतं. म्हणूनच त्याची साधना करत राहिलं पाहिजे. पं शिवकुमारजी यांची संतूरच्या सुरांवर हुकूमत होती पण शेवटपर्यंत ते स्वतःला साधकच समजत होते. जो साधक समजून आराधना करत राहतो, त्यालाच कलेची देवता प्रसन्न होते. याशिवाय संगीतामध्ये सृजनशीलता अत्यंत महत्वाची असते. याच सृजनशीलतेचे नवनवीन प्रयोग आपल्या संतूर वादनातून ते करत राहिले. रसिकांना भरभरून देत राहिले. काही कलाकारांनी एवढी प्रचंड साधना केली की ते कलाकार आणि ते वाजवीत असलेली वाद्यं यांच्याशी त्यांचं नाव जे निगडित झालं ते कायमचं. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# आकर्षक दिसणे आवश्यक

आधुनिक केसरी

“आपले धन” ह्या शब्दांमधूनच आपल्या स्वतःच्या पैशाविषयीच्या भाव-भावना प्रकट होत असतात. आपल्याला आपल्या स्वतःच्या धनाविषयी असलेले प्रेम आणि त्यामुळेच निर्माण झालेले आपल्या पैशाबरोबरचे नाते अतूट असते. आपले मन आणि धन एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यासारख्या असतात. आपल्या मनातले धन आणि धनाढ्य मन, तसेच मनातले घर आणि घरातले मन ह्या दोन्हींचा मेळ आपण घालू शकलो पाहिजेत.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

पै पै जमवलेली जमापुंजी आपल्या स्वतःसाठी अथवा घरासाठी वापरताना आणि मुख्य म्हणजे ती मिळवताना अनुभवलेल्या प्रत्येक क्षणाची आठवण आपल्याला झाल्याशिवाय राहात नाही. आपले प्रत्येक स्वप्न साकार होताना आपल्याला मिळणारा आनंद निश्चितच निराळा असतो. पण हि स्वप्न साकारण्यासाठी आपल्या पैशाची यथायोग्य बचत करणेही तितकेच जरुरीचे असते.

अत्याधुनिकीकरण आणि काही प्रमाणात अंधानुकरण यामुळे एकूणच आपल्या राहणीमानात बरेच बदल होत असतात. हे होणारे बदल एका अर्थी आपला विकासच घडवत असतात. आपले केवळ नीटनेटके राहणे हे पुरेसे नसून आपण चारचौघांमध्ये वेगळे आणि आकर्षक दिसणे आवश्यक झाले आहे. मुळातच सुंदर असणे आणि आकर्षक दिसणे ह्या दोन्ही गोष्टी जरी सौंदर्याची अनुभूती देणाऱ्या असल्या, तरीही केवळ सुंदर असणं पुरेसे नसून आकर्षक दिसणं आणि त्यासाठी नीटनेटके राहणे आवश्यकच असते. यामुळेच सुंदर असण्यापेक्षाही सुंदर दिसण्यासाठी काहीजणांचा कल असतो. त्यामुळे सुंदर आणि आकर्षक राहणीमानासाठी निश्चितच आर्थिकदृष्ट्या काही तरतूद करणे अनिवार्य असते. ह्या राहणीमानाची नुसती सवय होऊन चालत नाही, तर असे राहणीमान टिकवून ठेवण्यासाठी थोडाफार खर्चही करावा लागणे स्वाभाविक असते. एका दिवसाची सुंदरता ही कदाचित खिशाला परवडेल देखील, परंतू ती वर्षानुवर्षे टिकवणे निश्चितच खर्चिक ठरते.



आधुनिक केसरी

## तारील श्रीरंग | सर्वकाळ ||

लालसा मनीची | स्वार्थाला आंदन ||
क्लेशाचे कारण | अंती सत्य ||१||

माया स्नेह याची | ज्याला नसे चाड ||
तोच खरा द्वाड | जाण येथे ||२||

विकारांच्या ठायी | गुंतूनी पडला ||
तया न घडला | परमार्थ ||३||


ऐशा नरा नको | देऊ कोठे थारा ||
वासनेचा वारा | घात करी ||४||

संतसंग होता | होशील निस्संग ||
तारील श्रीरंग | सर्वकाळ ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## ।। दासबोध स्तवन ।।



# बद्धलक्षण

आधुनिक केसरी

समाजातील असे अनेक लोक आहेत की ते फक्त आणि फक्त स्वतः चा विचार करतात. आपल्या स्वभावाने, आपल्या बोलण्याने समोरचा दुखावला जातो हट्टी, दुराग्रही लोक समाजात जागोजागी आढळतात. त्यातून आजकालच्या सामाजिक परिस्थिती चा विचार केला तर भोगवादी विचारसरणी वाढली आहे. नको नको वाटेल अशी प्रसिद्धी माध्यमे वाईट विचारांना प्रोत्साहन देत आहेत. संतसहवास, आदर्श विचार चिंतनशील स्वभाव, खरे ते खोटे व खोट्या गोष्टींना प्रतिष्ठा मिळत आहे. हे सर्व बद्धलक्षण आहे



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

बद्धाच्या अंगी कोणममती लक्षणे असतात?

काम, क्रोध, गर्व, मदमत्सर, हेवा, तिरस्कार, पाप करण्यासाठी सतत तयार असतात. वाईटकर्म, वाईटविकार, भेदाभेद क्रुरपणा सतत समोरच्यानिंदा करणे.

वाईट कर्माचा सतत विचार करून तेकरणे, भेदाभेद (भेदाभेद भाव अमंगळ) सतत वादावादी करणे, निंदा अधर्म संपत्तीची अभिलाषा व ती जर मिळाली नाही तर सारासार विचार नकरता हवे ते टोकाचे वाईट पाऊल उचलणे या वाईट विचारांचा ऐवढा अतिरेक होतो की माणुसधर्म हा या लोकांच्या कडून विसरला जातो अशा अनेक दोषांचा अतिरेक म्हणजे बद्धलक्षण होय.

ओवी क्रमांक 28 च्या पुढेही काही गोष्टींचा आपण विचार करू भ्रष्टाचार, अनाचार, अनीती, अविचार, निष्ठूरपणा, घातकीपणा, हिंस्त्रपणा, घातकीपणा, तापटपणा, कुविद्या, दुराशा, स्वार्थीपणा भांडणतंटे,

लहानसहान गोष्टीवरून अनर्थ काढत बसणे व समोरच्याला प्रचंड मनस्ताप सहन करावयास लावणे दावा धरणे, दुष्टबुद्धी कामना, वासना, ममता, भावना, विकल्प, विषाद, मूर्खपणा, प्रपंचातील वाचाळपणा, पाखंडीपणा दुर्जनपणा थोतांडपणा, लबाडस्वभाव नास्तिकता, भ्रम, भ्रांति, अज्ञानाचा अंधकार, संशयी स्वभाव, आळशीपणा अतिशय कंजुसपणा, सतत लोकांना काही ना काही कारण काढून नावे ठेवत रहाणे, कोणत्याही गोष्टीचा साधकबाधक विचार न करणे त्याने काय होतं की स्वतः हा पण आडचणीत येतो व समोरच्याला नाहक त्रासाला सामोरं जावं लागतं हे सर्व बद्धलक्षणात मोडतं.

देसबुद्धीच्या प्राबल्याने ज्याच्या जीवनात पैसा आणि स्त्री यांना सर्वोच्च स्थान असते तोबद्ध असतो. तसेच ज्याच्या जवळ परमार्थाबद्दल अज्ञान व प्रपंचाचे अज्ञान असते त्याला स्वतः ला आनंद घेणे व दुसऱ्या ला पण आनंद देणे माहिती नसते तो बद्ध होय. ज्याला संतसंगतीची गोडी नसते पण संतनिंदेची आवड असते जो देहबुद्धीने बांधलेला असतो तो बद्ध होय. जो रात्रंदिवस द्रव्याचे सतत चिंतन करतो द्रव्याच्या हव्यासापोटी ज्याला रात्रीची झोप नीट लागत नाही जो अतिरिक्त मिळालेले द्रव्य सत्कर्माला वापरत नाही तो बद्ध होय.

थोडक्यात काय तर ! काया, वाचा, मन, चित्त, वित्त, जीव, प्राण, हे सर्व जो द्रव्यदारांचे चिंतनात गुंतवतो तो बद्ध असतो. द्रव्याच्या हव्यासापोटी जो आपले इंद्रिय निश्चल करतो, त्यांना चंचल होऊ देत नाही तो बद्ध असतो. तो इंद्रियांना स्थिरपणे द्रव्यदारांचे सेवेला लावतो, द्रव्यदार हे च त्याचे तिर्थ, हाच ज्याचा परमार्थ हाच ज्याचा स्वार्थ असतो तो बद्ध असतो. काळवेळ व्यर्थ जाऊ न देता जो सर्व काळसंसाराची काळजी करतो ज्याच्या गप्पा गोष्टी संसाराबद्दल असतात तो बद्ध असतो. स सततचा द्रव्याचा हव्यास, तास दोन तीन मिनिटेसुद्धा विचलीत होत नाहित मिनिटे ऐवढेच काय एक सेकंदसुद्धा ज्याचे मन चलित न होता सदासर्वकाळ द्रव्यदारा व प्रपंचाचें चिंतन करतो तो बद्ध होय. थोडक्यात काय तर कोणत्याही गोष्टीचा अतिरेक अरू नये सारे काही प्रमाणात असावे. हे बद्धलक्षणा वरून समजते.


# थोडे वाचावे पण कृतीत आणावे

आधुनिक केसरी

खूप समजून घ्यावे, ज्ञान संपादन करावे, असा पुष्कळ लोकांचा हव्यास असतो, आणि त्याच्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. हे एक प्रकारचे व्यसनच आहे.अफू खाणार्याला कैफ आल्याशिवाय चैन पडत नाही. थोडी अफू पचनी पडली की, कैफ येत नाही म्हणून तो आणखी अफू कैफ येईपर्यंत खातो. असे होता होता अधिकाधिक अफू पचनी पडत जाते, आणि शेवटी इतकी अफू खाण्याची वेळ येते की त्यातच त्याचा अंत होतो.

ज्ञान संपादनाचे असेच आहे; म्हणून थोडेच वाचून, समजून घ्यावे, आणि ते कृतीत आणावे. नाही तर जन्मभर ज्ञान संपादण्यात वेळ जातो, आणि कृति न झाल्या कारणाने पदरात काहीच पडत नाही. मनुष्याला पोटभर जेवायला पंचवीस-तीस मिनिटे पुरेशी होतात, पण जेवलेल्या अन्नाचे पचन होण्यासाठी पाचसहा तास जावे लागतात. मनुष्य एकसारखा जर खातच राहिला तर त्याला अजीर्ण होऊन तब्येत बिघडेल, आणि त्यातच त्याचा अंत होईल. म्हणून नुसते वाचीतच बसू नये. थोडेच वाचावे, पण ते कृतीत आणण्याचा प्रयत्न करावा.

नुसत्या वाचनाने किंवा विषय समजावून घेण्याने प्रगती होत नसून ते कृतीत आणण्याने प्रगती होते. म्हणून केवळ समजावून घेण्यापेक्षा, ते कृतींत आणण्यावर भर असावा. आपले आकुंचित मन विशाल करणे, आपण स्वार्थी आहोत ते निःस्वार्थी बनणे, हेच खर्या वेदांताचे मर्म आहे. नुसत्या विचाराने तत्त्वज्ञान निश्चित होणार नाही. त्यासाठी साधन करायला पाहिजे. जग सुधारायच्या नादी लागू नका; स्वतःला सुधारा की त्या मानाने जग सुधारेलच. आपण सुधारलो नाही तर मग जग सुधारले नाहीच !



वस्तू ही सुखाचे साधन असून आपण भ्रमाने तिलाच सुखरूप मानतो. याचा परिणाम असा होतो की, वस्तूच्या साहाय्याने सुख मिळविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी आपण वस्तूच जास्त मिळविण्याच्या मागे लागतो, आणि शेवटी दुःखी बनतो.

कर्माला सुरुवात करताना फळ मिळते किंवा नाही म्हणून काळजी आणि दुःख होते; कर्म करीत असताना, फळाकडे चित्त लागल्याने कर्माचे कष्ट होतात म्हणून दुःख होते. कर्म संपून फळ मिळाले नाही तर दुःख होते; आणि फळ मिळालेच तर त्यातून नवीन आशा उत्पन्न होऊन, फळ मिळाल्याचा आनंद ती मारून टाकते म्हणून दुःख होते.

सारांश, अथपासून इति पर्यंत दुःखच पदरात पडते. यासाठी, फळाची अपेक्षा सोडून कर्म करू लागलो की ते कर्म करीत असतानाच मनाला समाधान प्राप्त होते. म्हणून परमार्थाकडे रोकडा व्यवहार आहे, उधारीचा नाही, असे सर्व संतांचे सांगणे आहे.

अधिक वाचू नका, जे काही थोडे वाचाल, त्याचे मनन करा, आणि ते कृतीत आणा.

# जनशक्ती संघटनेच्या महिलांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर हंडा मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राज्यात सध्या औरंगाबादच्या नामांतरावरुन राजकीय पक्ष एकमेकांशी लढत आहे. राजकीय सभांमधून आरोप प्रत्यारोप होत आहे. बीकेसीच्या सभेत मुख्यमंत्र्यांनी नामांतराच्या मुद्द्यावर भाष्य केले. त्याला उत्तर म्हणून भाजपचे सरकार आल्यावर आम्ही संभाजीनगर करु, अशी घोषणा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केली. पण हा नामांतराचा मुद्दा पुढे करुन जनतेच्या मूळ प्रश्नांकडे राजकारणी मंडळी नेहमीच दुर्लक्ष करतायेत. आज जनशक्ती संघटनेच्या वतीने महिलांनी पाण्यासाठी औरंगाबादच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढला. 'नामांतर नको, चालिसा नको, भोंगा नको, आम्हाला पाणी द्या, आमच्या हक्काचे पाणी द्या', अशी आर्त मागणी शेकडो महिला करत होत्या.

औरंगाबादचे नाव बदलून संभाजीनगर करण्यासाठी गेली अनेक वर्षे राजकारणी मंडळी झुंजत आहे. निवडणुका जवळ आल्या की औरंगाबादच्या नामांतराचा वाद पेटवला जातो. लोकांच्या मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष करुन भावनांवर आधारित राजकारण होते, मतदान होते. परंतु यामध्ये लोकांच्या जगण्याचे प्रश्न मागे राहतात. औरंगाबादेत पाण्याचा मोठा प्रश्न आहे. आठवडा-आठवडा नळाला पाणी येत नाही. त्यामुळे महिलांना मोठा त्रास सहन करावा लागतो. शहरातील अनेक भागांत नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. मात्र पाणी प्रश्न बाजूला ठेऊन सत्ताधारी-विरोधक नेहमीच भावनांवर आधारित राजकारण करत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्या महिलांनी केला. जनशक्ती संघटनेच्या महिला डोक्यावर हंडा घेत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्या. पाणी आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे... कोण म्हणते देत नाय, घेतल्याशिवाय राहत नाही.... नको भोंगा-नको चालिसा आम्हाला हवे आमच्या हक्काचे



पाणी, अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दणाणून गेला होता. पाण्यासाठी महिलांनी आक्रमक रुप धारण केले होते. 'सत्ताधारी आणि विरोधक भावना-अस्मितांचे राजकारण करतात, आमचे प्रश्न मागे पडतात. आम्हाला होत असलेला त्रास, आमच्या यातना आम्ही कुणाला सांगायच्या? सत्ताधारी विरोधकांनी घाणेरडे राजकारण बंद करावे, आमच्या पाण्याचा प्रश्न सोडवावा नाहीतर खुर्च्या खाली कराव्यात', अशी आक्रमक मागणी आंदोलनकर्त्या महिलांनी केली.

कालपरवा नामांतराच्या प्रश्नावरुन राजकारण करणाऱ्या राजकारणी मंडळींवर एमआयएम खासदार इम्तियाज जलील यांनी टीकास्त्र डागले होते. औरंगाबादकरांना नामांतर नकोय तर पाणी हवे, औरंगाबादमध्ये एकटे फिरा, लोक तुम्हाला हंड्याने मारतील, असं म्हणत आजी-माजी मुख्यमंत्र्यांवर जलील यांनी जोरदार टीका केली होती.

# धुळे महापौरपदासाठी तातडीने निवडणूक घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**

**धुळे :** महापालिकेच्या महापौरपदाबाबत दाखल याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. तथापि, प्रदीप कर्पे यांनी कालच आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे काय निकाल लागतो, याकडे साऱ्यांचे लक्ष लागून होते. त्यानुसार आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होवून महापौरपद हे सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित करून तातडीने निवडणूक घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

धुळे महापालिकेचे महापौरपद सुरुवातीचे अडीच वर्षे खुल्या प्रवर्गासाठी होते. त्यानंतर अडीच वर्षासाठी ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षण निघाले पण ओबीसी समाजाची जनगणना झाली नसल्याने आरक्षण निश्चित होऊ शकत नाही. त्यामुळे ते रद्द करावे, अशी याचिका सामाजिक कार्यकर्ते गणेश निकम यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यावर आज सकाळी कामकाज झाले. तथापि, महापौर कर्पे यांनी कालच आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने या निकालाबाबतची उत्सुकता आणखीनच वाढली होती. आज सकाळी न्यायालयात सुनावणी होणार असल्याने प्रदीप कर्पे यांनीही न्यायालयात हजेरी लावली होती.

यावेळी न्यायालयाने महापौर पद सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित करुन तातडीने निवडणूक घेण्याचे आदेश दिले. याबाबत महापौर कर्पे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनीही या वृत्तास दुजोरा दिला. दरम्यान, खुल्या प्रवर्गातून कोणत्याही उमेदवाराला ही निवडणूक लढविता येणार असल्याने इच्छुकांमध्ये चढाओढ निर्माण होण्याची शक्यता आहे. दरम्यान, महापालिकेत भाजपची सत्ता असून पक्षश्रेष्ठी कोणाला संधी देतात, याकडेही आता साऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत. तथापि, गेल्यावेळीही अनेकजण या पदासाठी इच्छुक होते. संधी न मिळाल्याने इच्छुकांमध्ये नाराजी होती. परंतु पुढल्यावेळी संधी देवू, असे आश्वासन मिळाल्याने इच्छुकांना शांत करण्यात आले होते. त्यामुळे आता महापौरपदाची निवड करताना पक्षश्रेष्ठींचाही कस लागणार आहे.



# जगाला आदर्श जीवनाचा मापदंड देणारे फक्त बुद्धच : भीमराव परघरमोल

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** पंचशीलाच्या रूपाने तथागत गौतम बुद्धांनीच जगाला सर्वात प्रथम आदर्श मानवी जीवनाचा मापदंड प्रदान केला, असे प्रतिपादन भिमराव परघरमोल यांनी संग्रामपूर तालुक्यातील पीपरी माळेगाव येथे 17 मे रोजी बुद्ध जयंती निमित्त मार्गदर्शन करतांना केले.

सविस्तर वृत्त असे की, तेल्हारा येथून जवळच असलेले पिंपरी माळेगाव येथे बुद्ध पूर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी आठ वाजता पासून भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन संध्याकाळी सहा वाजता संपूर्ण गावामधून कॅन्डल मार्च (दिप फेरी) काढण्यात आली. त्यानंतर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आले होते. महापुरुषांच्या प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्वतराव सरदार हे असून प्रमुख उपस्थितीमध्ये भाई बाबुराव सरदार (भूमी मुक्ती मोर्चा बुलढाणा जिल्हा) भिमराव परघरमोल, ज्ञानदेव भारसाकळे (जि प सदस्य बुलढाणा) राजेश नृपनारायण, वा.ता. भारसाकडे गुरुजी, योगेश पोहरकर, सिद्धार्थ बोदळे, मंगेश सुभेदार यांची उपस्थिती होती.

भिमराव परघरमोल आपल्या व्याख्यानामध्ये पुढे म्हणाले की, तथागत बुद्धाच्या पूर्वी आणि समकालीन उपलब्ध साहित्य तथा तत्वेवेत्यांकडे कोणत्याही प्रकारचा आदर्श जीवनाचा मापदंड नव्हता. तो पंचशीलाच्या रूपाने तथागतांनीच सर्वप्रथम प्रतिपादन करून नीती तत्त्वांना जन्माला घातले. असे ते म्हणाले. समाजाने बुवा-बापू यांना भजू नये, अन्यथा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराचा तो अपमान असेल अशी मांडणी भाई सरदार यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धम्मदीप वानखडे यांनी केले तर आभार मंगेश सुभेदार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष सुखदेव गायगोळ, संतोष  देवमन गायगोळ, शिवचरण सरदार, सुमेध गायगोळ, प्रवीण गायगोळ, ज्ञानदेव गायगोळ, विजय गायगोळ यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी परिसरातील अनेक महिला, पुरुषांची उपस्थिती होती.

# महसूल विभागाकडून उपाययोजना करा : सुरेश चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व परिसरात सध्या शेतकऱ्यांच्या खरिपाच्या पूर्व मशागतीच्या कामांनी वेग घेतला असताना त्यासोबतच पीक कर्जाच्या फेऱ्यातही परिसरातील शेतकरी गुंतलेले आहे. मात्र सोयगाव तालुक्यात पीक कर्जासाठी लागणाऱ्या संचिकेसाठी शेतीचा सातबारा मिळतो. परंतु एकूण जमिनीचा दाखल्यासाठी शेतकऱ्यांच्या रांगाच रांगा लागलेल्या आहे. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे जमिनीचा दाखला मिळत नसल्याने बळिराजा अडचणीत आला आहे.

बँकांकडून पीक कर्जाला सुरुवात झालेली आहे. परंतु एकूण जमिनीचा दाखला मिळत नसल्याने शेतकऱ्यांना ऐन खरिपाच्या तोंडावर बियाण्यांच्या खरेदी आणि शेतीच्या आहे. मशागतीसाठी पैशांची गरज आहे. बँका पीक कर्ज देण्यासाठी तयार आहे. परंतु



एकूण जमिनीचा दाखला उपलब्ध होत नाही. महा-ई-सेवा केंद्रांमध्ये तांत्रिक अडचणी आणि पोर्टल बंद अभावी सातबारा मिळतो. परंतु एकूण जमिनीचा दाखला मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या रांगा पाहायला मिळत आहे. ऑनलाइन एकूण जमिनीचा दाखला मिळत नसल्याने तलाठी सज्जेवर एकूण जमिनीच्या दाखल्यासाठी महसूल विभागाकडून उपाय योजना करण्यात याव्या अशी मागणी सरपंचपती सुरेश चव्हाण घाणेगांव तांडा यांनी सोयगाव महसूल विभागाला केली आहे. जर एकूण जमिनीचा दाखला मिळाला नाही तर अनेक शेतकऱ्यांची पीक कर्जाची संधी निघून जाण्यासाठी शक्यता आहे.

# रेल्वे मंत्रालयाकडून अखेर अधिकृतरित्या औरंगाबादच्या पिटलाइनला मंजुरी

## डॉ. भागवत कराड यांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अनेक वर्षांपासूनची औरंगाबादकरांची मागणी मान्य करत अखेर रेल्वे मंत्रालयाने औरंगाबाद स्टेशनवर पिटलाईन बांधण्याच्या मंजुरीचे आदेश दि.10 मे 2922 रोजी दमरेला दिले आहेत. जुन्या पिटलाईनच्या बांधणीसाठी लागणाऱ्या 29 कोटी 94 लाख 26 हजार रूपये निधीला अंब्रेला योजनेअंतर्गत मंजुरी देण्यात आली असून रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी दिलेला शब्द खरा केला तर ना. अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या सततच्या पाठपुरावा आणि प्रयत्नाला यश आले.

पिटलाईन एकूण सोळा डब्यांची असणार असून ती CAMTECH तंत्रज्ञानाने बांधली जाणार आहे. या पिटलाईनच्या मंजुरीमुळे औरंगाबादवरून लांब पल्ल्याच्या गाड्या सुटण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. याचा थेट फायदा औरंगाबादच्या औद्योगिक आणि पर्यटन क्षेत्राला होणार असून देशातील अनेक मोठ्या शहरांसाठी औरंगाबादवरून थेट रेल्वे सेवा उपलब्ध होऊ शकेल. शहरातून विशेषतः बंगळुरू, अहमदाबाद, अकोला-अमरावती-नागपूर, तिरूपती, वाराणसी-प्रयागराज, पाटना, बिकानेर-जोधपूर या आणि अनेक मोठ्या शहरांसाठी थेट रेल्वे



सेवेची अनेक वर्षांपासून मागणी आहे मात्र औरंगाबादला गाड्यांच्या देखभालीची व्यवस्था नसल्याने नवीन गाड्या सुरू करण्यात अडचणी येत होत्या. या नवीन पिटलाईनच्या निमित्ताने रेल्वे प्रशासनाला औरंगाबादवरून नवीन गाडी मंजूर करताना आता अडचण येणार नाही. होणारी पिटलाईन सुरूवातीला सोळा डब्यांची जरी असली तरी त्याचा भविष्यात विस्तार करून ती 24 डब्यांची करता येईल. यासाठी दमरेने नमुद केल्याप्रमाणे एकनाथ नगर येथील रेल्वे क्रॉसिंग गेट बंद करावे लागणार आहे, त्यानंतरच पिटलाईन 24 डब्यांची करता येईल. मराठवाडा रेल्वे कृती समितीचे अध्यक्ष अनंत बोरकर यांनी या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला असून रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे आणि अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांचे आभार मानले आहेत. अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी स्वतः रेल्वे अधिकारी आणि मराठवाडा रेल्वे कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन औरंगाबाद स्टेशनवरील पिटलाईन च्या जागेची पाहणी मागे केली होती. आता पिटलाईनसाठी टेंडर कधी निघते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. औरंगाबाद येथील मराठवाडा रेल्वे कृती समितीच्या संघर्षाला मोठे यश असे म्हणावे लागेल.



# गहू निर्यातीला परवानगी !

आधुनिक केसरी

गेल्या तीन दिवसांपासून चर्चेत राहिलेल्या गहू निर्यातीच्या मुद्द्यावर केंद्र सरकारने आता मोठा निर्णय घेतला आहे. गेल्या आठवड्यात शनिवारी केंद्र सरकारने देशांतर्गत दरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी गव्हाच्या निर्यातीवर तडकाफडकी बंदी घातली होती. यासाठी देशात गव्हाचा तुटवडा निर्माण झाल्यास दर आणखीन वाढण्याची शक्यता असल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गव्हाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला होता. विशेषत: युरोपमध्ये गव्हाच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला होता. त्यामुळे युरोपात गव्हाच्या किमती देखील मोठ्या प्रमाणावर वाढल्या होत्या. अखेर केंद्र सरकारने यासंदर्भात मोठा निर्णय घेतला असून गव्हाच्या निर्यातीला सशर्त परवानगी दिली आहे. केंद्राने घेतलेल्या निर्णयानुसार १३ मे पूर्वी ज्या गव्हाच्या निर्यातीची नोंदणी करण्यात आली आहे, तो गहू निर्यात करण्यास परवानगी देण्यात आली आहे. उद्योग मंत्रालयाकडून यासंदर्भातला निर्णय जाहीर करण्यात आला आहे. तसेच, कांडला बंदरावर इजिप्तला निर्यात करण्यासाठी लोडिंग सुरू असलेला गहू देखील पाठवण्याची परवानगी देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. केंद्राने दिलेल्या परवानगीनुसर इजिप्तला ६१ हजार ५०० मिलियन टन गव्हाची निर्यात होण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. मे. मेरा इंटरनॅशनल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडे इजिप्तला गहू निर्यात करण्याचे कंत्राट असून त्यासंदर्भात कांडला बंदरावर लोडिंग सुरू आहे. त्यापैकी ४४ हजार ३४० मिलियन टन गव्हाचे लोडिंग जहाजावर झाले असून १७ हजार १६० मिलियन टन गव्हाचे लोडिंग अद्याप बाकी आहे. ते लोडिंग होऊन हा गहू आता इजिप्तला जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. इंधन आणि अन्नपदार्थाच्या दरवाढीमुळे एप्रिलमध्ये महागाईने गेल्या आठ वर्षांतील उच्चांक गाठला. गव्हाचे सर्वात मोठे निर्यातदार देश असलेल्या रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू असल्याने जागतिक स्तरावर आधीच गव्हाचे दर तेजीत आहेत. अनेक देशांत गव्हाचा तुटवडा निर्माण होऊन दर गगनाला भिडले आहेत. भारतात ही परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी हा निर्यातबंदीचा निर्णय घेण्यात आल्याचे निर्णय जाहीर करताना संचालनालयाने स्पष्ट केले होते. गहू निर्यातबंदीचा निर्णय तातडीने लागू करण्यात आला असला तरी त्या आधी निश्चित झालेला गहू निर्यात व्यवहार पूर्ण करण्यास मुभा देण्यात आल्याचे परदेशी व्यापार संचालनालयाने स्पष्ट केले आहे. गहू निर्यात तातडीने थांबवली असली तरी काही देशांनी त्यांची गरज भागवण्याची विनंती भारताकडे केली आहे. त्यामुळे अशा निवडक देशांना होणारी गहू निर्यात सुरू राहील, असे देखील परदेशी व्यापार संचालनालयातर्फे सांगण्यात आले.

# सर्वसामान्यांचे आयुष्य भस्मसात होण्याच्या मार्गावर ?



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**देशात व राज्यात पक्ष-विपक्षाचे राजकीय पुढारी महागाईच्या बाबतीत फक्त बघ्याची भूमिका बजावतांना दिसत आहे व प्रत्येक पक्ष आपले शक्ती प्रदर्शन करण्यात गुंग आहेत. कारण महागाईने संपूर्ण रेकॉर्ड तोडुन उच्चांक गाठला आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत असे दिसून येते की राजकीय पुढाऱ्यांना महागाईशी काहीही देणेघेणे नसावे. देशातील प्रत्येक व्यक्ती वाढत्या उन्हामुळे होरपळत आहे व उष्माघाताने मरतो आहे तर दुसरीकडे महागाईने उच्चांक गाठल्याने गरीब व सर्वसामान्य व्यक्तीचे आयुष्य भस्मसात होण्याच्या मार्गावर असल्याचे दिसून येते.**

आज वितभर पोटासाठी जे आपण अन्न शिजवितो त्या गॅसची किंमत आज तब्बल 1052 रूपये झाली. मग खरोखरच गरीब व सर्वसामान्य व्यक्ती जगेल की मरेल! महाराष्ट्रात पक्ष-विपक्ष फक्त राजकीय तमाशा करतांना दिसत आहे. त्यांना जनतेच्या सुखदुःखाशी काहीही देणेघेणे नसावे असे मला स्पष्ट दिसुन येते. कारण आज प्रत्येक गोष्टीची झळ गरीब व सर्वसामान्यांना सोसावी लागत आहे. विजेची झळ सर्वसामान्यांनी सोसावी. विजेचे बिल थकीत असले तर विज विभाग ताबडतोब विज कापत असते. परंतु जे राजकीय पुढारी गरीबांना व सर्वसामान्यांना ग्यान सांगतात त्याच राजकीय पुढाऱ्यांवर लाखोंचे विजेचे बिल थकीत आहे त्याचे काय? असा प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित आहे. आज उर्जा विभागाच्या माहितीनुसार महाराष्ट्रातील राजकीय पुढाऱ्यांकडे एकुण 1 करोड 27 लाख रुपयांचे बिल थकीत असल्याचे सांगण्यात येते. देशाचा विचार केला तर राजकीय पुढाऱ्यांवर विजेचे बिल कीती थकीत असेल हे सांगणे कठीण आहे. सध्या कडक उन्हाळा असल्याने विजेची मागणी वाढत आहे तर दुसरीकडे कोळसा टंचाईमुळे औष्णिक वीज निर्मिती समोर मोठे संकट असतानाच वीज पुरवठ्याची सर्वाधिक भिस्त असलेल्या कोयना जलविद्युत प्रकल्पाचे देखील राज्य सरकारचे विजनिर्मितीसाठी मोठे आव्हान आहे.

या प्रकल्पात आता वीजनिर्मितीसाठी जेमतेम 20 दिवसांचा जलसाठा उपलब्ध आहे. याचा संपूर्ण त्रास सर्वसामान्यांना होणार आहे. एवढे संकट असुन सुद्धा राजकीय पुढारी विजेची थकबाकी भरायला तयार नाही. म्हणजे आता राजकीय पुढाऱ्यांचे असे झाले आहे की गरीबांना व सर्वसामान्यांना त्रास झाला तरी चालेल परंतु आपल्याला त्रास व्हायला नको. राजकीय पुढारी व मंत्री विजेचे बिल थकीत ठेवतात. मग हे काय खरोखरच गरीब आहेत काय? सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रात भोंग्याचे राजकारण सुरू आहे. काही काळ वाझे, अनिल देशमुख, रिया चक्रवर्ती, सुशांत राजपूत, समिर वानखेडे, परमबिर सिंह, संजय राऊत, कंगणा रानावनात, नवनीत राणा इत्यादींवर राजकारण चालले यात प्रत्येक पक्ष एकमेकांवर तोफा डागायचे आणि आताही तेच सुरू आहे. परंतु सर्वसामान्यांना काय त्रास व वेदना होत आहे याकडे कोणीही लक्ष देण्यास तयार नाही ही महाराष्ट्राची शोकांतिका म्हणावी लागेल. आजही सोशल मीडियाच्या माध्यमातून किंवा वर्तमानपत्राच्या माध्यमातून आपण पहातो व ऐकतो त्यात फक्त




राजकीय बातम्या, चौकशी, पक्ष-विपक्षांची उखाडपाखाड हाच लपंडाव दिसून येतो. परंतु लोक महागाईने मरत आहे. याच्याशी राजकीय पुढाऱ्यांना तिळमात्र चिंता नसल्याचे स्पष्ट दिसून येते. एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे महाराष्ट्रात तब्बल 4 महिने एसटी बंद होती. यामुळे महाराष्ट्राची 12 कोटी जनता त्रस्त होती. यात खाजगी ट्रायव्हलवाल्यांनी अक्षरशः जनतेला लुटले. परंतु राज्य सरकारने फक्त बघ्याची भूमिका घेतली. यापलीकडे काहीही केले नाही. मग राज्यातील लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, मंत्री यांचे जनतेच्या प्रती काय दायित्व असायला हवे. सध्याच्या परिस्थितीत राजकीय पुढारी जनतेच्या सेवेपेक्षा स्वतःच्या सेवेत मग्न असल्याचे दिसून येते.

सध्या अत्यावश्यक वस्तू, पेट्रोल-डिझेल, एलपीजी गॅस सिलेंडर यांचे भाव आभाळाला टेकले आहे. परंतु यावर पक्ष-विपक्ष लक्ष न देता फक्त भोंग्यावर लक्ष देत असल्याचे दिसून येते. ठीक धार्मिक स्थळांवर भोंगे असावे किंवा नसावे, असेल तर त्याचा आवाज किती असावा हे कायद्याला ठरवु द्या यात राजकारण करू नये. परंतु संपूर्ण राजकीय पक्षांच्या प्रती शोकांतिका आहे की भोंग्यासाठी मोर्चे काढत आहे, हनुमान चालीसा पठण करीत आहे, महाआरती करीत आहे. परंतु महागाई कमी झाली पाहिजे यासाठी आंदोलन किंवा उपोषण करायला कोणताही पक्ष तयार नाही. ही गरीब व सर्वसामान्यांच्या प्रती थट्टा असुन चिंतेची बाब आहे. महाराष्ट्रातील 12 कोटी जनतेनी 288 आमदार व 48 खासदार निवडून दिले. याव्यतीक्त विधानपरिषदेतील आमदार वेगळे. त्याचबरोबर राज्यसभेचे खासदार वेगळे येवढे लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी असतांना महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, शैक्षणिक समस्या, वीजेची समस्या यावर आळा का घालण्यात येत नाही? राज्याच्या 12 कोटी जनतेला महागाई पासून कोण मुक्ती देणार ? असे अनेक प्रश्न जनमानसांच्या मनात भेडसावत आहे. महागाईमुळे लग्नांना सुध्दा ग्रहण लागले आहे याचा फटका वधुवरांच्या माता-पित्यांना भोगावा लागत आहे.

महागाईमुळे शिक्षणाचा खर्च दुप्पटीने वाढला आहे. महागाईमुळे शेअर बाजार सुध्दा मंदावले आहेत. प्रत्येक दिवशी महागाई वाढत असल्याने जनमानसात आपल्याला रोष दिसून येतो. यामुळे आता असे चित्र दिसुन येते की राजकीय पुढारी मस्त तर गरिब व सर्वसामान्य त्रस्त अशी परिस्थिती उदभवल्याची दिसून येते. मी सरकारला व पक्ष-विपक्षांच्या राजकीय पुढाऱ्यांना आग्रह व विनंती करतो की महागाईला नियंत्रणात ठेवण्यासाठी युध्दपातळीवर कार्य करण्याची नितांत गरज आहे. तेव्हाच गरिब व सर्वसामान्य जनता सुखी होईल.

# सर्वसमावेशक राजकारणाची गरज



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**सातान्यातील भटके-विमुक्त समाजाच्या एका कार्यक्रमात बोलताना नेहमीप्रमाणे पवार साहेबांचा तोल घसरला आणि पाथरवट या कवितेतील ओळींचा संदर्भ देत ते म्हणाले की "आम्ही मूर्ती घडविल्या, तुम्ही देवळात ठेवल्या आणि साल्यांनो तुम्ही आम्हाला देवळात येऊ देत नाही."**

वास्तविक पाहता पाथरवट नावाच्या कवितेमध्ये कवींनी पाथरवट म्हणजे दगड फोडून त्याला आकार देणारा, मूर्ती बनवणारा समाज यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहे. ज्या राठोड नावाच्या कवीने ही कविता रचलेली आहे ते स्वतः काही या पाथरवट समाजाचे नसतील कारण जर असते तर त्यांना भटके विमुक्त समाज किती धार्मिक आहे हे माहिती असते. जो समाज देवी देवतांच्या मूर्त्या बनवतो तो स्वतः सुद्धा धार्मिक समाज आहे. त्याला अनादिकाळापासून कधीही मंदिर प्रवेशापासून कोणीही रोखलेले नव्हते.भटके-विमुक्त समाजामध्ये जोगी, नाथजोगी, गोसावी, वासुदेव, मरीआई वाले, नंदीबैलवाले, ज्योतिष वाले, डोंबारी असे वेगवेगळ्या पद्धतीचे लोक आहेत. हा समाज या गावावरून त्या गावावर फिरणारा समाज असला तरी त्या समाजाच्या चालीरीती आहेत. त्यांना त्यांचे देव आहेत. त्यांच्या परंपरा आहेत. प्रथा आहेत. हा समाज अशिक्षित असला तरी सुद्धा देव मानणारा आहे. आपल्या देशामध्ये विशेषतः महाराष्ट्रामध्ये समस्या फक्त सुशिक्षित लोकांचीच आहे. जो समाज अशिक्षित आहे, गरीब आहे तरीसुद्धा तो समाज आपला देव, आपल्या चालीरिती सांभाळून आहे. मात्र त्यांच्या जगण्यावर कविता करणारे किंवा कविता करून घेणारे यामध्ये मात्र नास्तिकते चे प्रमाण अधिक आहे. याच कवितेमध्ये हे राठोड नावाचे कवी म्हणतात या देवी देवतांच्या मूर्त्या आम्ही बनविलेल्या आहेत. मग सांगा बरं ब्रम्हदेव आमचा निर्माता आहे की आम्ही त्यांचे पिता आहोत. लेखक पुढे म्हणतो की इंद्राच्या रूपामध्ये कार्ल मार्क्स आमच्या कडे आला आणि त्यालाही आम्ही आमची कवचकुंडले देऊन टाकली. या वरून कविचा मार्क्सवादा कडील कल दिसून येतो. पवार साहेबांशी राठोड साहेबांचे संबंध आहेच. पवार साहेबांच्या कृपेवर त्यांना अनेक पदे सुद्धा मिळालेली आहेत असे समजते. त्यामुळे आपलाच कवि, आपलीच कविता, त्याद्वारे हिंदू धर्माला ठोकण्याची संधी पवार साहेबांनी नेहमीप्रमाणे घेतलेली आहे. वास्तविक पाहता ज्यांनी कवीला कदाचित कविता करण्याची प्रेरणा दिली असेल ते पवार साहेब व ज्या कवींनी ती कविता केली ते राठोड साहेब या दोघांनाही ही गोष्ट सांगावीशी वाटते की ज्या हातांनी मूर्ती बनविली तो मूर्तिकार जर ब्रह्मदेवाचा पिता असता तर ज्याने त्या मूर्तिकाराला मूर्ती घडविण्यासाठी हात दिले,छन्नी हातोडा पकडण्यासाठी बोट दिले त्या परमेश्वराला काय म्हणावे? या लोकांनी थोडा विचार केला असता तर त्यांना कळले असते की ज्या परमेश्वराने आपल्याला हे शरीर दिलेले आहे, ज्याच्या भरवशावर आपण इतकी वर्ष सत्ता सुख उपभोगत आहोत, त्या परमेश्वराबद्दल कृतज्ञतेचे थोडे तरी भाव त्यांच्या मनात असते व त्यांनी कदाचित अशा पद्धतीचे शब्द वापरलेले नसते. दुसरा विषय असा आहे की एका काळात अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. परंतु त्याच्या विरोधामध्ये अनेक साधुसंतांनी, अनेक महापुरुषांनी सुद्धा आवाज उचललेला होता. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी रत्नागिरी येथे मंदिरामध्ये अस्पृश्यांना प्रवेश मिळावा यासाठी केलेला सत्याग्रह तर प्रसिद्धच आहे. त्यामुळे मंदिरात प्रवेश सर्वांनाच मिळायला पाहिजे आणि तो मिळतोच आहे. समजा एखाद्या समाजाला काही काळापूर्वी मंदीर प्रवेश नव्हता परंतु त्या समाजाला आता तर मंदिर प्रवेश आहे ना! परंतु पवार साहेब तुम्हाला तर मंदिरप्रवेश फार आधीपासूनच आहे त्याचा काय उपयोग आपण करून घेतला? सरकारी आदेशानी मंदिर प्रवेश मिळू शकतो परंतु सरकारी आदेशाने भक्ती निर्माण होऊ शकत नाही. आयुष्यभर आपण सत्ता उपभोगली आहे. त्यामध्ये सर्व जाती पंथाच्या लोकांनी आपल्याला मतदान केलेले आहे. आयुष्याच्या संध्याकाळी सुद्धा आपण पुन्हा एकदा समाजामध्ये असंतोष निर्माण करणारे विधान करणे हे आपल्याला निश्चितच शोभत नाही असे वाटते. राजकीय पक्षाच्या नेत्यांनी, त्यांच्या व्यक्तिगत एखाद्या समाजाबद्दल असलेल्या आकसाला नियंत्रणात ठेवणे गरजेचे आहे.कारण एखादा समाज एखाद्या मतदारसंघात अल्पसंख्य राहू शकतो. परंतु हे लक्षात ठेवले पाहिजे की त्या समाजाचा सुद्धा कुठलातरी मतदारसंघ असतोच. ज्यांना संपूर्ण राज्याची सत्ता मिळवायची आहे त्या लोकांनी सर्वसमावेशक राजकारणाकडेच लक्ष दिले पाहिजे. केवळ पश्चिम महाराष्ट्रातील विशिष्ट समाजाला नेहमी जातीचा लॉलीपॉप दाखवून आपण भुलविले आहे. इतके वर्ष सत्तेत राहून सुद्धा आपण मराठा आरक्षणासाठी काय केले? ओबीसी आरक्षणासाठी काय केले? धनगर आरक्षणासाठी काय केले? मागच्या काही महिन्यांमध्ये महाराष्ट्रातले राजकारण आणि वातावरण अतिशय गढूळ झालेले आहे. छत्रपती संभाजीराजे यांना तुळजापूरच्या मंदिरात देवीच्या गाभाऱ्यात प्रवेशापासून रोखण्यात आले. कोणी रोखले? मंदिर प्रशासनाने रोखले. का रोखले? कारण सरकारी आदेशानुसार पुजाऱ्या व्यतिरिक्त कोणालाही गर्भगृहात प्रवेश नाही म्हणून रोखले. तुळजापुरच्या देवीचे पुजारी हे पूर्वीपासूनच मराठा समाजाचे असतात. सरकार कोणाचे आहे? पवार साहेबांचे. कवींनी कविता पाथरवटांवर केली.परंतु मंदिर प्रवेशापासून ज्यांना रोखण्यात येत होते तो समाज वेगळा होता. ते पाथरवट नव्हते. त्यामुळे कवींनी पाथरवटांना समोर करून वेगळ्या समाजाच्या भावना सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. संभाजीराजे तर छत्रपती आहे. मग त्यांना मंदिर प्रवेशापासून का रोखण्यात आले त्याची कारणे आपण पाहिलेली आहे. तरीही साल्यांनो ह्या शिव्या कुणाला? स्वातंत्र्य पूर्वी जे मंदिर प्रवेशाला रोखत होते त्या समाजाला का? म्हणजे तुमच्या मनातून एखाद्या विशिष्ट समाजाबद्दलचा राग जातच नाही का? समाजाला 75 वर्ष जुन्या गोष्टींची आठवण करून देणे यातून समाज एकसंघ राहणार आहे का? जे तुम्ही भाषणात सांगता की आपण जातीयवादापासून धार्मिकवादापासून दूर राहिले पाहिजे व एकसंघ राहिले पाहिजे. आपले संपूर्ण जीवन जातीयवादाला खतपाणी घालण्यात, जातीयतेचे राजकारण करण्यात व जातीयवादी संघटना उभ्या करण्यामध्ये गेलेले आहे आणि आपण एकसंघतेची भाषा करता व साल्यांनो हि म्हणता. आपले नेमके चरित्र समजून घेण्यास महाराष्ट्र असमर्थ ठरला आहे असे वाटते. कोणी भोंगे काढा म्हटले की तुम्ही म्हणता की महागाईवर बोला, बेरोजगारीवर बोला. मग साल्यांनो म्हणण्या ऐवजी तुम्हीसुद्धा महागाई व बेरोजगारी वर का बोलत नाही ? हनुमान चालीसा म्हणणारे तुमच्या दृष्टीने धार्मिक तेढ निर्माण करीत आहे आणि जुन्या गोष्टी उकरून काढून समाजामध्ये आपण जातीय तेढ निर्माण करीत नाही का? उन्हामध्ये रिक्षा ओढणारा वयोवृद्ध रिक्षाचालक पाहिला की मला बरेचदा पावसात भिजणाऱ्या तुमची आठवण येते. तो रिक्षा चालक सुद्धा आयुष्याच्या संध्याकाळी आपल्या परिवारा करता रिक्षा ओढत आहे आणि आपण सुद्धा आपल्या पक्षाचा (परिवाराचा) गाडा एकटेच ओढत आहात. येणाऱ्या काळामध्ये लोक विकासाचा पर्याय निवडतील व आपले खरे स्वरूप ओळखतील असा विश्वास आहे.

**(लेखक सुप्रसिद्ध वक्ता तथा सामाजिक व राजकीय विचारवंत आहे.)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मंदा सोनुले : संघर्षाची, शोकात्म वेदनेची करुण कहाणी

आधुनिक केसरी

**मंदा सोनुले एम.ए.ची वर्गमैत्रीण. किनवट सारख्या अदिवासी बहुल पाटोदा या खेडेगावातून नांदेडात शिकायला आलेली. कमालीची अबोल, लाजरीबुजरी. पीपल्स कॉलेजमध्ये प्राचार्यांच्या केबीनपुढं मुलांची पत्र पोस्टमन ठेवून जायचा. पोस्टाच्या पत्राचं तेव्हा खूपच अप्रुप वाटायचं. तेच संपर्काचे प्रभावी, स्वस्त माध्यम. माझं पत्र शोधत असतांना मंदाच्या लहान बहिणीने तिला पाठविलेले पत्र हातास लागलं. ते वाचलं. तसं दुसऱ्याच्या पर्सनली गोष्टी आपण माघारी वाचू नये, चर्चू नये. हा मुर्खपणा माझ्या हातून घडून गेला. त्या गोष्टीचं आज वाईट वाटतं. पण कोणतीही पोषक, शाश्वत पार्श्वभूमी नसतानी ही मुलगी नांदेड सारख्या ठिकाणी पदव्युत्तर शिक्षण घेतेय, याचं समाधान वाटलं. तिच्या प्रतीचा आदर वाढीस लागला.**

या पत्रात व्यालेली टिकी गाय तिचं वासरू, वाऱ्यानं तुटलेल्या तारा, उन्मळून पडलेले शेतीतील खांब, उडून गेलेली झोपडी, पाण्यासाठी रानोमाळ करावी लागणारी भटकंती आणि पत्राच्या अखेरीस 'तू लय मनाला लावून घेवू नगं...आमची काळजी करू नगं...ध्यान लावून अभ्यास करं....'' सारं सारं एखाद्या तेलचित्रासारखं शेतकऱ्यांच्या घरातलं भीषण दारिद्र्य अनुभवत होतो. 'सत्यजित रे' नी दिग्दर्शित केलेला सिनेमा डोळ्यासमोरून सरकत गेला. पद्मीनी मदकुंठे व मंदा सोनुले अदिवासी वस्तीग्रहात राहून शिक्षण घेतं. पद्मीनी सध्या रेणुकामाता महाविद्यालय, माहूर येथे मराठीची प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. कथाकार, कादंबरीकार म्हणून देखील तिने लौकिक मिळवला. पीपल्सचे तास सकाळी सात वाजता भरायचे. मी वर्गात सी. आर असल्याने मुलांशी बिनधास्त बोलनं व्हायचं पण मुलींशी बोलण्याची हिम्मत कधी झाली नाही. कमालीचं घाबरलेपण अंगात दाटायचं. कधी नजरेला नजर देवू शकलो नाही. निव्वळ पुस्तकी किडा बनत गेलो. कधीतरी एखादी मुलगी बोलली तर आकाश ठेंगणं व्हायचं. हुरळून जायचो. चुकून नजरानजर झाली तर चटकन मान खाली घालायचो. स्वतःच्या भिकुरडेपणाची लाजही वाटायची. गुलाब जाधव, शरद वाघमारे, कुमार खरात, विलास पंडित, विठ्ठल माने, सूर्यप्रकाश जाधव, उमेश पुजारी, माधव वाघमारे ह्यां मित्रांशी कधीतरी मन खुलं करतं गेलो. कालांतराने आम्ही सर्वजन वेगवेगळ्या क्षेत्रात, कामात रमत गेलो.

विद्यापीठीय कामानिमित्ताने नांदेडला पद्मीनी मदकुंठे यांची कधीतरी भेट होते. कँन्टिंग मधील 'चहा' नावाचं उकळलेलं गरम पाणी संपेपर्यंत जुन्या आठवणी उकलत जातात. कोण कुठे ? काय करतो ? या बाबींना उजाळा मिळत राहतो. पुनः नोकरीच्या, संसाराच्या चक्रव्यूहात, पिंजऱ्यात माणूस स्वतःला अडकवून टाकतो. विद्यापीठ, संस्था, प्राचार्य यांचे पटलेले, न पटलेले पत्रक- आदेश- उपदेश निमुटपणे 'पाळत' भिंगरीसारखा पळत राहतो. पळवल्या जातो. 'स्वातंत्र्य कुठल्या गाढवीचं नाव आहे ?' ही ढसाळांची कविता विद्यार्थ्यांच्या गळी, मानसी उतरविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. अन स्वतःच्या हिजडेपणावर शी..थू... करत राहतो.

मध्यंतरी किनवट हून सुनिल अनंतवार या मित्राचा फोन आला. "राऊत, खूप वाईट गोष्ट घडली यार'. काय झालं ? 'मंदा सोनुले यांचे मिस्टर अँटक येवून वारले". काही क्षण मला काय बोलावं सूचेना. सुनील कडून तिचा फोन मिळवला. वीस वर्षानंतर तिच्याशी बोलत होतो. प्रचंड दुःखाचं ओझं घेऊन ती बोलतं होती. दोन लेकरं सांभाळण्याची चिंता बोलण्यातून वाहतं होती. नवऱ्याचा चांगुलपणा सांगत होती. अनेक संकटाचा, संघर्षाचा



पाढा कितीतरी वेळ सांगत राहीली. राहून राहून रडत होती. पुनः बोलत होती. मी हा... हू...अरेरे....सांभाळ... काळजी घे.....तुच कोलमडून पडलीस तर कसं ? लेकरांकडं लक्ष दे..! असे सहानुभूतीचे कोरडे तुकडे जोडतं सांत्वन करण्याचा केविलवाणा प्रयत्न करत होतो. व्यवहाराचे गणितीय हिशोब जुळवत होतो. येईल कधीतरी भेटायला ? असं पांढरपेशीय आश्वासन देवून बोलण्यास पूर्णविराम दिला खरा ; पण मी आतून खूप हादरलो. तिच्या वैधव्याचा, वयाचा, आयुष्याचा अंधार अनेक प्रश्न उपस्थित करतं गेला. पाडगावकरांच्या भातुकलीच्या खेळातील अधूरी कहाणी ऐकणं किती आल्हाददायी असतं पण प्रत्यक्ष जगणं खरचं किती काटेरीपण सिद्ध करतं. रात्री बायकोला ही गोष्ट सांगितली. तिलाही खूप वाईट वाटलं. अधुनमधून सहानुभाचं एकदोनदा बोलनं झालं. परवा एका लग्नाच्या निमित्ताने परिवारासह माहूरला जाणं झालं. निघतांनाच मंदाची भेट घ्यायचं मनात होतं. ती माहूरच्या जवळ उनकेश्वर येथे प्रियदर्शनी अदिवासी आश्रमशाळेत वस्तीग्रह अधिक्षक पदी कार्यरत. पूर्वी येथे शरभंग ऋषीचा आश्रम होता. या ऋषीचा त्वचा रोग बरा करण्यासाठी रामाने बाण मारून तयार केलेल्या गरम पाण्याच्या कुंडाचे संदर्भ रामायणात येवून जातात. मंदिराच्या प्रवेशद्वारावर या आशयाचा शिलालेखही पहावयास मिळतो. ते पाहण्याचं कुटुंबाला, लेकरांना कुतूहल होतं. मंदाला फोन करून तिथंच असल्याची खात्री केली. भेटीस येतोय म्हणून कळवलं. जायला खूप उशीर झाला. रात्रीचे सात वाजले. मंदिराच्या उत्तरेला उंच डोंगरावर प्रियदर्शिनी आश्रमशाळा. हातातील ताटल्यावरून वस्तीग्रहातील मुलामुलींचे नुकतेच जेवणं झालेली असावीत असा अंदाज. काही मुली मैदानात रिंगण घालून गप्पा करण्यात दंग असलेल्या दिसल्या. अशा दूर्गम भागात असंख्य शेतकरी-अदिवासीची मुलंमुली शिकत असल्याचे समाधान वाटले. संस्थेनी बांधून दिलेल्या दोन छोट्या छोट्या पत्र्याच्या रूममध्ये मंदानी संसार थाटलेला. कर्मचाऱ्यांच्या राहण्या संबधीच्या असुविधा झाकल्या जात नव्हत्या. खालच्या रूममध्ये शाळेचे मुख्याध्यापक अंतापुरे सर राहत असल्याचं मुलींकडून समजलं. त्यांची भेट होवू शकली नाही. आमचा पाहुणचार करण्यात मंदासोबत



शेजारच्या तेलंग मँडम मनापासून झटत असल्याचं दिसत होतं. शेजाऱ्यांच्या सुखदुःखात झोकून देण्याची श्रीमंती, दानत अजूनही ग्रामीण भागात टिकून असल्याचे तेलंग मँडमकडे पाहून वाटतं होतं. त्यांचा परिचय मंदानी करून दिला. वीस वर्षांपूर्वीची लांब केस असलेली हाडकुळी मंदा थोड्याशा स्थुल व बॉबकट मध्ये वेगळी, जबाबदारीचं भान असलेली वाटली. गमतीने म्हणालो देखील मंदा, बॉबकट कधीपासून ठेवायलीस. तेव्हा अरे राऊत, मध्यंतरी मी कोरोना पॉझिटिव्ह आले.... मरता मरता कशीतरी वाचले..... काही खरं नव्हतं.... केस गळायला लागले. बालाजीला जावून केस अर्पण करून आले. 'बालाजी अन केस अर्पण करणे' या कृतीचं थोडसं हसू आलं. महात्मा फुलेंचा केशवपणाचा विचार तिरूपती पर्यंत पोहोचला नसावा. त्याला श्रध्देचा मुलामा दिला गेला असावा. राजीखुशी मामला. पण लाजाळू बाई आज धडधड बोलतं होती. याचं समाधान होतं. लाईट गेल्याने अंधार पडला होता. सोबत योगानंद महा, वसमतचा माझा मित्र प्रा. ज्ञानेश्वर गाडे. त्याचं, माझं कुटुंब आमच्या सोबत होतं. बसायला जागा अपूरी होती. उकाडाही जाणवत होता. चहापान करत गप्पा झाल्यावर सोबत आलेल्या महिला मंडळांना मंदा सोबत मुक्त चर्चा करता यावी व आम्हाला परिसर न्याहाळता यावा म्हणून गाडेसरांसह बाहेर पडलो. वस्तीग्रहातील मुलीशी संवाद साधला. न मागता सल्ला देण्याचा आजार रोकता आला नाही. त्यांना बोलकं करावं म्हणून त्यांच्या आस्थेचे प्रश्न विचारत गेलो. रेखा मेश्राम, सायली पंधरे,सपना मंडावी, पल्लवी घोगेवाड, वैष्णवी तोडसांब, प्रियंका सातपुते, नेहा घोगेवाड..... या सारख्या कितीतरी मुलींच्या बोलण्यात समजसपणा जाणवत गेला. त्यांच्या काही समस्या त्याच्या मुक  असण्यातही समजून घेतं गेलो. सुविधांच्या बाबतीत शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून ही लेकरं खूप दूर असल्याची जाणीव प्रकर्षाने झाली. हळूहळू मुली खूप धीडपणे व्यक्त होत होत्या. घरच्या परिस्थितीची जाणीव बोलण्यातून मोकळेपणाने मांडत होत्या. अदिवासींची गौंडीबोली काही मुलींनी बोलून दाखवली. कळत नव्हती पण बोलीतील गोडवा प्रभावी होता. तिथली संस्कृती, सण उत्सव, जगणं सहजपणे व्यक्त होत होतं. बारावी नंतर आईवडील लग्न करून देतात. उच्च शिक्षण घेता येत नसल्याची खंतही त्यांनी बोलून दाखवली.अशा दूर्गम भागातील अदिवासी, भटक्या लेकरांसाठी मंदा 'सिंधूताई सपकाळ' सारखं 'माई' बनताना दिसली. स्वतःचे अनाथपण त्यांच्यात विरून टाकतांना दिसली. ती त्यांचं दुःख समजून घेतं आपलं दुःख मानतेय, ही गोष्ट मला खूप थोर वाटली. दोन इवल्याशा पत्र्याच्या रूमात ती समाधान मानते. ज्या रूममध्ये 'धड' आम्हाला बसताही येत नव्हतं तिथं 'धीट'पणे राहते. तिच्या भवतालच्या मुलींच्या हसऱ्या, गप्पीष्ट जगामुळे विधवेचं दुःख काही क्षण विसरण्यास भाग पडतं असावं. सुट्ट्याचा काळ कदाचित तिला खायला उठत असेल. एकटेपणाची तीव्र जाणीव करून देत असेल का ? या मुलींच्या सहवासात पती गेल्याचा विरह विसरत असेल का ? सृष्टी, सार्थकच्या भवितव्याचा काय विचार मनात चालला असेल ? असे कितीतरी 'दुःखाचे श्वापद' तिच्या वर्तमानाला टोचण्या देत असतील. समाजव्यवस्थेनं घालून दिलेलं तरूण विधवेचं पांढरं कपाळ पुरूषी विखारी नजरांसाठी कुरणं ठरतं. ते शापितपण टाळण्यासाठी मंदाच्या कपाळावरची टिकली पाहून आनंद वाटला. तसं टिकली, कुंकू, मंगळसूत्र, जोडवी ही प्रतिक स्त्रीयांनाचं, पुरूषांना का  नसावीत ? काही क्षणासाठी ताराबाईंचे 'स्त्री-पुरुष तुलना' हे चिंतन चमकून गेलं. पुढं चंद्रपूर व बाबा आमटे यांच्या आनंदवनाला भेट द्यायची असल्याने निघण्याची घाई अधिक काळ आम्हाला तिथं थोपवू शकली नाही. जड अंतकरणाने मंदाचा, मुलींचा, आश्रमशाळेचा निरोप घेतला. भवतालचा 'अंधार' व मंदाच्या आयुष्यातील 'अंधार' ड्रायव्हिंग करतांना अधिक अस्वस्थ करत गेला. पैनगंगेच्या पात्रातील पाण्याचे ठिपके ठिपके निरंव शांततेत अधिकच भेसूर वाटत होते. रस्त्याच्या कडेची उंच उंच सागवान झाड कापत कापत आमच्या गाड्या पांढरकवड्याच्या दिशेने धावत होत्या.....!

ज्ञानदेव राऊत
संपर्क क्र. 9421485386

---

प्रकाशझोत

# सोने गहाण टाकून झाडे जगवली



ब्रह्मानंद चक्करवार
मो. 9923447777

आधुनिक केसरी

**गावांकडून शहरांकडे, शहरांकडून महानगरांकडे या स्थित्यंतराने मानवी जीवनात अन्न-वस्त्र-निवारा या मूलभूत गरजांची जागा सर्व सुख-सोयीसुविधांनी युक्त चैनीच्या घटकांनी घेतली. तसे मानवी आयुष्याचे तत्वे बदलत गेली. खरेतर सध्याच्या पैसा केंद्रित आयुष्यात तत्वांना काही ही स्थान नाही. तत्वांना काडीची ही किंमत नाही. आजच्या या पैसा केंद्रित जगात लोकं नितीमत्ता गहाण टाकून आयुष्य जगतात. पण मूठभर का होईना आजही अशी काही माणसे आहेत की, ज्यांच्यामुळे कली ला कलयुगात ही पापाचा कळस गाठता येत नाहीये.**

आजच्या या पैसा केंद्रित जगात लोकं नितीमत्ता गहाण टाकून आयुष्य जगतात. पण प्रशांत गिऱ्हे या माणसाने सोने गहाण टाकून, एलआयसी पॉलीसी गहाण टाकून झाडे जगविली. आजमितीला एक-दोन, शे-दोनशे किंवा हजार-दोनहजार झाडांचे नव्हेतर तब्बल लाख-दिडलाख झाडांचे पालकत्व प्रशांत गिऱ्हे पार पाडत आहेत. प्रशांत गिऱ्हे यांना २०१० पासून झाडांचं वेड लागलं आहे. अतिशय चालाख लोकांच्या मार्केटिंग क्षेत्रात कार्यरत असलेले प्रशांत गिऱ्हे वृक्षमित्र आहेत, वृक्षसंवर्धक आहेत हे ही एक नवलच! असं म्हणतात की, माणूस ज्या क्षेत्रात कार्यरत असतो त्याप्रमाणे त्याचा स्वभाव, त्याचं वागणं, त्याचं जगणं असतं. पण प्रशांत गिऱ्हे याला अपवाद आहेत. मार्केटिंग क्षेत्र म्हणजे अतिशय चालाख लोकांचे क्षेत्र. मनाने नव्हेतर डोक्याने चालणाऱ्या लोकांचे क्षेत्र. तत्वांना, भावनांना काडीचीही किंमत न देणाऱ्या लोकांचं क्षेत्र. टार्गेट आणि फक्त टार्गेट अचिव्ह करण्यासाठी पळणाऱ्या, शब्दांचा खेळ करून विक्री उद्दिष्ट गाठणाऱ्या लोकांचं क्षेत्र. अशा क्षेत्रात कार्यरत असूनही या माणसाकडे मन आहे आणि त्याचं हे मन झाडांत गुंतलं आहे, हे आश्चर्य नाहीतर काय?

मार्केटिंग क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रशांत गिऱ्हे यांनी एखांद्या प्रोडक्ट सेलिंगची फर्म स्थापन करण्याऐवजी 'जनसहयोग' ही वृक्षारोपण, वृक्षजतन, वृक्षसंवर्धन करणारी संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमाने त्यांनी त्यांच्या मित्रांसह मिळून औरंगाबाद शहरातील





छावणी परिसर, विद्यापीठ परिसर, सिल्कमिल कॉलनी, पडेगाव परिसर, गोलवाडी डंपिंग ग्राउंड अशा २८ भागात देशी वृक्षांचे रोपण, जतन, संवर्धन केले आहे. ते आणि त्यांचे मित्र स्वखर्चाने लाखो वृक्षांचे पालकत्व पार पाडत आहेत.

शासनाच्या वनविभागाने, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उद्यान विभागाने प्रशांत गिऱ्हे यांच्या वृक्षारोपण, वृक्षजतन, वृक्षसंवर्धन पद्धतीचा आदर्श घेऊन त्याचे अनुकरण करावे असे प्रशांत गिऱ्हे यांचे या क्षेत्रातले कार्य आहे. गिऱ्हे यांच्या या अनमोल कार्याची दखल घेऊन सिनेअभिनेते तथा वृक्षमित्र, वृक्षसंवर्धक सयाजी शिंदे यांनी 'जनसहयोग' निर्मित गोलवाडी येथील देशी वृक्ष संवर्धन केंद्राला नुकतीच भेट देऊन त्यांचे कौतुक केले.

आपली वने, वनसंपदा उद्धवस्त करणाऱ्या एकाही विदेशी झाडांना प्रशांत गिऱ्हे आणि त्यांच्या मित्रांची 'जनसहयोग' जागा देत नाही. सागरगोटे, बिबा, शमी, बकूळ, खैर, वारंग, आपटा, घेळा, मुरुड शेंग, आसना, पिंपरी, फणशी, बोथी, गोंदण, देव बाभूळ, कांचन, बिजा, मोखा, अजाण, धावडा, तिवस, कुमकुम, बोंडारा, टेटु, परस पिंपळ, शिरीष, काटे सावर, सोनसावर, ताम्हण, कुडा, बेहडा, हिरडा, रिठा, ऐन, अर्जुन, लोखंडी, पाडळ, पांगरा, बूच पांगरा, कौशि, वावळ, मेढशिंगी, शिवण, खिरनी, मुचकुंद, पुत्रंजिवा, बारतोंडी, सलाई, कुकेर, मोई अशा शेकडो देशी वृक्ष प्रजातींच्या रोपण, जतन आणि संवर्धनासाठी प्रशांत गिऱ्हे आपले आयुष्य वेचत आहेत. त्यांच्या या कार्याकडे पाहून आजीचं एक वाक्य आठवतं, "माणसाच्या जन्माला आला त माणसा सारखं वाग...माणसासाठी जगं....पैसा-पैसा काय करत राहतो...? पैसा काय मड्यावर बांधून न्यायचा का...?"

---

# मिस यू सायमंडस..!

आधुनिक केसरी

ऑस्ट्रेलियन क्रिकेटला कोणाची दृष्ट लागली हेच समजेनासे झाले आहे. ऑस्ट्रेलियाचे एकसे बढकर एक दिग्गज खेळाडू जग सोडून चालले आहेत. काही दिवसांपूर्वी लेगस्पिनचा बादशहा शेन वार्न हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने गेला. शेन वार्नच्या अनपेक्षित जाण्याने केवळ ऑस्ट्रेलियन क्रिकेट प्रेमीच नव्हे तर जगभरातील क्रिकेटप्रेमींना मोठा धक्का बसला. त्या धक्क्यातून क्रिकेट प्रेमी सावरत नाही तोच आणखी एक धक्का देणारी बातमी समोर आली. ऑस्ट्रेलियाचा तडाखेबंद खेळाडू अँडरू सायमंडस याचे कार अपघातात निधन झाले. डिन जोन्स, जेफ मार्श, शेन वार्न आणि आता सायमंडस ...ज्या प्रमाणे क्रिकेटमध्ये एक खेळाडू बाद झाला की संघाला गळती लागते आणि एका पाठोपाठ एक खेळाडू बाद होत जातात तसे एका पाठोपाठ एक ऑस्ट्रेलियन खेळाडू जगण्याच्या खेळातून बाद होत चालले आहे. सायमंडस हे नाव माहीत नाही असा क्रिकेटप्रेमी सापडणार नाही. १९९९ ते २००७ या काळात क्रिकेट विश्वावर अधिराज्य गाजवणाऱ्या या खेळाडूचा ९ जून १९७५ रोजी जन्म झाला. बर्मिंगहॅम मधल्या एका दाम्पत्यांकडून त्याच्या ऑस्ट्रेलियन आई वडिलांनी त्याला दत्तक घेतले तेंव्हा तो फक्त तीन महिन्यांचा होता. त्याच्या जन्मदात्या आई वडिलांपैकी कोणीतरी आफ्रिकन होते त्यामुळे तो जन्मताच कृष्णवर्णीय होता मात्र त्याच्या दत्तक आई वडिलांनी त्याला चांगले सांभाळले. शाळेत असल्यापासूनच त्याला क्रिकेटची आवड होती. शालेय वयातच त्याने क्रिकेटमध्ये करिष्मा दाखवायला सुरवात केला. काऊंटी क्रिकेट  सामन्यात त्याने २५४ धावांची तडाखेबंद खेळी केली या खेळीत त्याने तब्बल १६ षटकार मारताना न्यूझीलंडच्या जॉन रिडचा १५ षटकारांचा विक्रम मोडला या खेळीने त्याला ऑस्ट्रेलियन संघात प्रवेश मिळवून दिला. ऑस्ट्रेलियन कसोटी संघात प्रवेश मिळाल्यावर त्याने संघासाठी दोन शतके झळकावली. त्यातील एक शतक त्याने भारताविरुद्ध सिडनी येथे झळकावले. त्याच्या याच शतकाने भारताचा विजय हिरावून नेला. याच कसोटीत हरभजनसिंग व त्याच्यात मंकी गेट प्रकरणावरून वाद झाला होता हा वाद विकोपाला जाऊनही जेंव्हा तो आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स कडून खेळू लागला तेंव्हा त्याची आणि हरभजनसिंगची चांगली मैत्री झाली. सायमंडस हा आक्रमक खेळाडू होता. त्याची बॅट म्हणजे जणू एक हातोडा होता. गोलंदाजांनी टाकलेला बॉल हा केवळ आकाशात भिरकवण्यासाठीच असतो असे तो म्हणायचा त्यामुळेच तो नेहमी कमी चेंडूत जास्त धावा काढायचा. त्याच्या याच खुबीमुळे तो ऑस्ट्रेलियन संघाच्या एकदिवसीय आणि टी २० संघाचा अविभाज्य भाग बनला. २००३ आणि २००७ हे दोन विश्वचषक ऑस्ट्रेलियाला जिंकून देण्यात त्याचा मोठा वाटा होता. त्याने २४ कसोटीत २ शतके आणि १० अर्धशतकासह १४६२ धावा केल्या तर एकदिवसीय सामन्यात ६ शतके आणि ३० अर्धशतकासह ५०८८ धावा केल्या. त्याची कारकीर्द आणखी लांबली असती मात्र काही दुर्गणांमुळे त्याला त्याची कारकीर्द वाढवता आली नाही. त्याने त्याच्या कारकिर्दीत मोठमोठे विक्रम केले नाहीत पण आपल्या तडाखेबंद खेळीने क्रिकेट प्रेमींच्या मनात मात्र स्थान मिळवले. आज  जरी तो या जगातून निघून गेला असला तरी क्रिकेट प्रेमींच्या मनातून त्याचे स्थान मात्र कधीही जाणार नाही. सायमंडसला भावपूर्ण श्रद्धांजली! मिस यु सायमंडस......!!

श्याम ठाणेदार
९९२२५४६२९५

# साहित्यिकांची मोट बांधण्याचा, प्रयत्न आहे नवा, विजयाताई मारोतकर, तीन पिढ्या साधणारा दुवा

"पोरी जरा जपुन" च्या माध्यमातून मी विजया ताईंच्या संपर्कात आलो. त्यांचं साहित्य आणि त्यांच्या विचारांनी प्रभावित झालो. त्यांच्याशी भेटीचे स्वप्न मनात फुलवू लागलो. अशात २०१८ साली संपन्न झालेल्या अखिल भारतीय ओबीसी साहित्य संमेलनात, एका परिसंवादात मी त्यांच्यासोबत सहभाग घेतला. आणि, आमच्या वैचारिक मैत्रीचा धागा दृढ होवू लागला. या माझे मैत्रीत प्रा. प्रभाकर तांडेकर यांचीही मोलाची साथ लाभली. संमेलनातील परिसंवादामध्ये, ताई ज्या पोटतिडकीने बोलत होत्या, त्यातून त्यांची समाजाप्रती असलेले आस्था, भरकटलेल्या मुलींबाबत असलेली चिंता, शब्दाशब्दातून जाणवत होती. परिसंवाद त्यानंतर त्यांच्याशी दीर्घ चर्चा झाली. त्यातून त्यांनी केलेले सामाजिक कार्य मला समजले. ताई या केवळ शब्दांचे बुडबुडे उडवत नाहीत. तर, समाजातील दुःख, वेदना दूर करण्यासाठी प्रत्यक्ष काम करतात, याचा परिचय झाला. "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले" या म्हणीची प्रचिती, त्यांच्या वागण्या-बोलण्यातून आणि कृतीतून जाणवली. समाजामध्ये अशा प्रकारच्या व्यक्तिमत्त्वांचे प्रमाण, अतिशय अत्यल्प असले तरी, विजया ताईंसारखी माणसं, "या जगण्यावर, या जन्मावर, शतदा प्रेम करावे.!" असं म्हणायला भाग पाडतात. तेव्हापासून मी त्यांच्या साहित्य अभियानाशी जुळलो. "पोरी जरा जपून" या काव्यमय प्रबोधनात्मक कार्यक्रमाने ३०० चा टप्पा पार केला असून, संपूर्ण महाराष्ट्राने त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. या पुस्तकाची नुकतीच दुसरी आवृत्ती बाहेर आलेली असून, त्याचे आई-बाबा, गुरुजन, पालक आणि मुलींनीही स्वागत केले आहे. आपण एक शिक्षिका आहोत, तत्पूर्वी एक स्त्री आहोत आणि आई आहोत याचे त्यांना भान आहे. आपल्यातील आई, मुलींबाबत होणाऱ्या दुर्देवी घटना पाहू शकत नाही. त्या अस्वस्थेतूनच "पोरी जरा जपून" या दिशेने त्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यक्रमाच्या सादरीकरणाचे स्वरूप पूर्णपणे वेगळे असून, आपल्या व्याख्यानातून त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या अनुभवलेल्या घटना, त्या कथा स्वरूपात सादर करतात. मुलींना वास्तवाचे भान देतात. समाज किती विकृत आहे याची जाणीव करून देतात. त्यातूनही जर कुणी आपले आत्मभान जागृत केले नाही, तर होणाऱ्या परिणामांना त्याच कारणीभूत ठरतील, हे वास्तव त्या कथांमधून प्रभावीपणे मांडतात. त्यांचे विचार श्रोत्यांना भावतात आणि त्यातून जनजागृती होते. आदरणीय सिंधुताई सपकाळ यांनी त्यांच्या कार्याचे भरभरून कौतुक करुन, आशीर्वाद दिले आहेत. विजया एक प्राध्यापिका आणि सुखवस्तू घरातील स्त्री आहे. तिला मुलगी नाही. तरीही त्या लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याचे कार्य करीत आहेत. या बाईचे, आईत झालेले रूपांतर आणि तिची भ्रमंती आपल्याला अभिमानास्पद वाटते, असं सिंधुताई म्हणाल्या होत्या. असाच विचार समाजातील महिलांनी केला, तर आज ऐरणीवर असलेला स्त्री सुरक्षेचा प्रश्न चुटकीसरशी सोडवता येईल, असे त्या म्हणाल्या होत्या. विजयाताईंचे हे कार्य पाहून, त्यांनी त्यांना विदर्भाची माई अशी पदवी देखील बहाल केली होती.


विजया ताईंचे आतापर्यंत ३५ पुस्तक प्रकाशित झाले आहेत. त्यातील ७ कथासंग्रह ७ काव्यसंग्रह, २ चारोळी संग्रह, ४ ललित लेखांचे संग्रह, २ समीक्षा संग्रह आणि १४ चरित्रात्मक लेखनाचे पुस्तक प्रकाशित आहेत. धुक्यात हरवलेली वाट ही त्यांची एक कादंबरी असून विजयाताईंनी एमकॉम बीएड पर्यंतचे शिक्षण केलेलं आहे. त्यांनी भारतातील पहिल्या ओबीसी महिला साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले असून माय मराठी नक्षत्र प्रतिष्ठान नागपूर या संस्थेच्या त्या विद्यमान अध्यक्ष आहेत. गोव्यात झालेल्या महिला संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भुषविले आहे. त्यांच्याच प्रयत्नातून नागपुरात दोन दिवसीय राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन नुकतेच संपन्न झाले.

या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, डॉ. श्रीपाल सबनीस यांनी भूषवले होते. संमेलनाचे उद्घाटन माजी कृषिमंत्री हर्षवर्धन देशमुख यांनी केले. या संमेलनात नक्षत्रांचे देणे या कवी संमेलनाचे अध्यक्षपद, ताईंनी मला देऊन, खानदेशच्या साहित्यिकाला विदर्भात एक मोठे व्यासपीठ मिळवून दिले. यानिमित्ताने मला साहित्य संमेलनातील दोन दिवसीय भरगच्च कार्यक्रमांचा अनुभव घेता आला. या संमेलनातील कोरोना नंतरच्या आव्हानात्मक काळात, मराठीच्या संवर्धनार्थ साहित्यिकांची भूमिका काय होती.? या विषयावर संजय नाथे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. मंदा नांदुरकर, डॉ. अरुंधती वैद्य, मिलिंद रंगारी डॉ. गणेश चव्हाण यांनी अतिशय समर्पक अशी चर्चा घडवून आणली. या चर्चेचा सूर

आधुनिक केसरी




**सध्या समाजामध्ये सर्वदूर प्रदूषण पहायला मिळते. पाण्याचे प्रदूषण, हवेचे प्रदूषण, ध्वनी प्रदूषण वातावरणाचे प्रदूषण. अशा विविध प्रदूषणांसोबत साहित्य आणि साहित्यिक क्षेत्रातही प्रदूषणाचा धुमाकूळ माजलेला आहे. साहित्यिकांचे एकमेकातील वाद, भांडण, हेवेदावे आणि विचारांच्या प्रदूषणाने, सर्वत्र दुही माजलेली असतांना, सर्व साहित्यिकांना एकत्र आणून, त्यांची मोट बांधण्याचा प्रयत्न करणाऱ्या नागपूरच्या विजयाताई मारोतकर म्हणजे, तीन पिढ्या सांधणारा दुवा झालेल्या आहेत. त्यांच्या "पोरी जरा जपून" या पुस्तकाने आणि त्याच विषयावरील जनजागृतीपर व्याख्याने, महाराष्ट्रामध्ये एक नवा विक्रम प्रस्थापित केलेला आहे. समाजातील दुष्प्रवृत्तींविरुद्ध आवाज उठवणे, प्रबोधन करणे, नव्या विचारांची प्रेरणा देणे यासाठी त्या, साहित्याचा उपयोग करून करून घेत आहेत. साहित्य हेच लोकशिक्षणाचं माध्यम बनवणाऱ्या विजयाताई मारोतकर म्हणजे, प्रबोधनाचं चालताबोलतं व्यासपीठ झालेले आहेत. विदर्भातील नागपूर नगरीमध्ये संपन्न झालेल्या, माय मराठी नक्षत्र समूहाच्या, पहिल्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनात, मी पाहिलेले विजयाताईचे रूप म्हणजे, साहित्याच्या क्षेत्रात उमटलेली नव-प्रभाच आहे असे मला वाटते. संमेलनात त्यांच्या सोबत घालवलेल्या, काही क्षणांच्या आठवणींना अत्तरासारखा सुगंध प्राप्त झालेला आहे. त्या आठवणींचा दरवळ, मनाला मोहित करणारा आणि नवी प्रेरणा देणारा आहे.**




विजयाताई मारोतकर - तिन पिढ्यांना जोडणारा साहित्यिक ऋणानुबंध

कोरोनाने साहित्यिकांना लिहिते केले आणि सामाजिक भान जागृत केले, असा उमटला. विजयाताई मारोतकर यांनी लिहिलेल्या कोरोना काळातील विविध घटनांवर लॉकडाऊनच्या कथांचे एक पुस्तकही या निमित्ताने प्रकाशित करण्यात आले होते. ज्याचा वक्त्यांनी मुक्तकंठाने गौरव केला.

याच साहित्य संमेलनामध्ये अभिरूप न्यायालयात, विजयाताई मारोतकर यांना आरोपी म्हणून उभा करून, त्यांच्या जीवनातील विविध घटनांवर तसेच त्यांच्या साहित्यातील प्रेरणा यावर मंगेश बाऊसे, विशाल देवतळे, मंजुषा कोटकर यांनी समर्पक प्रश्न विचारून, त्यांना बोलते केले. आपल्या जीवनात आलेल्या अनपेक्षित घटनेमुळे, संसार कसा सैरभैर झाला आणि त्या वावटळीतही आपण, शांत, संयमी, विचारी राहत, आपल्या जगण्याला कसा अर्थ दिला, याची साधक-बाधक चर्चा विजयाताईंनी मांडली. तेव्हा सभागृहामध्ये उपस्थित असलेला, प्रत्येक श्रोता अंतर्बाह्य ढवळून निघाला होता. विजयाताईंनी सांगितलेले अनुभव, हे प्रत्येकाच्या मनाला चटका लावणारे होते. त्याच वेळेस त्यांनी कठीण परिस्थितीशी ज्या संघर्षाने तोंड दिले, ती जिद्द, तो संघर्ष अनेकांना प्रेरणा देणारा वाटला. अशा परिस्थितीतही स्वतः स्थिर राहून, इतरांना सोबत घेत, विचारांची मोट बांधत, लिहत्या हातांना बळ देत, विजयाताईंनी माय मराठी नक्षत्र सारखी संस्था उभी केली. त्या माध्यमातून शेकडो साहित्यिकांना लिहितं केलं. त्यांच्या विचारांना मुक्त व्यासपीठ मिळवून दिलं. त्यांना महाराष्ट्रातील विविध विचारवंतांचे विचार ऐकण्याची संधी मिळवून दिली. हे कार्य वरवर छोटं दिसत असलं तरी. याची व्याप्ती किती विशाल आहे, ते संमेलनाच्या यशस्वी आयोजनातून दिसून आले. या संमेलनात निमंत्रितांच्या काव्य संमेलनामध्ये दुर्गेश सोनार यांच्या अध्यक्षतेखाली नितीन देशमुख, अनंत राऊत, हबीब भंडारे, तीर्थराज कापगते, सुरेखा कटारिया, वनश्री पाटील, प्रियंका गिरी, अशोक कुबडे, स्वाती सुरंगळीकर, माधुरी चौधरी, विशाल इंगळे, कविता पुदाले, कुसुम मला, निशा डांगे नायगावकर यांच्या कवितांनी श्रोतृवर्गाला खिळवून ठेवले.

संमेलनात स्नेहल पाठक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कथाकथन सत्रामध्ये सप्तर्षी माळी, संगमित्रा खंडारे, अनंत ढोले यांनी हृदयस्पर्शी कथा सादर केल्या. तर, डॉक्टर उषाकिरण आत्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या पुरुषांच्या जगात स्त्रीचे जगणे या विषयावरील परिसंवाद, हा स्त्रीयांच्या वास्तवावर परखडपणे मत व्यक्त करणारा ठरला. या परिसंवादांमध्ये डॉ उषाकिरण आत्राम, प्रवीण जोंधळे, विजया ब्राह्मणकर, राजेंद्र वाटाणे, ममता इंगोले, संध्या राजूरकर यांनी स्पष्ट आणि परखड मतं मांडले. संमेलनाचा समारोप पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू, डॉक्टर शरद निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. त्यांनी विजयाताई मारोतकर यांच्या कामाचे, नियोजनाचे आणि कल्पकतेचे भरभरून कौतुक केले. अशा व्यक्ती समाजांमध्ये उभे राहत असतील, तर निकोप समाज वाढीसाठी त्याचा निश्चितच उपयोग होईल. असं म्हणत, त्यांनी विजयाताई या केवळ व्यक्ती नसून, एक संस्थाच बनलेल्या आहेत असे गौरवोद्‌गार नोंदवले.

या संमेलनाला उपस्थित राहतांना, मी माझ्यासोबत माझी मुलं, लोकेशन आणि भोजराज यांनाही सोबत नेले होते. साहित्य क्षेत्रात आपण नेमकं काय काम करतो, त्याचं दर्शन आपल्या पुढच्या पिढीला घडावं. त्यातून त्यांना दिशा मिळावी. साहित्याबद्दल प्रेम निर्माण व्हावं आणि त्यांनीही साहित्यिक आणि साहित्याचा आदर करावा, त्यांनी सजग व्हावं. यासाठी केलेला हा माझा अल्प प्रयत्न होता. तो १०० टक्के साध्य झाला, असं मला वाटतं. या माध्यमातून पुढच्या तरुण पिढीला देखील, महान लेखक - कवींसोबत विजयाताईंसारख्या प्रभावी व्यक्तिमत्वाचे दर्शन घेता आले. त्यांच्या विचारांची, कर्तृत्वाची झेप बघता आली. समाजात किती महान व्यक्तिमत्त्व आहेत. आणि, ती किती उत्तुंग कार्य करतात, याचे आम्हाला दर्शन झाले. ही त्यांची प्रतिक्रिया म्हणजे वर्तमान पिढीने भूतकाळाची घेतलेली उचित दखल आणि भविष्याबद्दलची आशाताई पहाट आहे, असे मला वाटते.

समारोप सत्रामध्ये आपल्या आभाराच्या मनोगतात, विजयाताई भारावून गेल्या होत्या. त्यांचे नेत्र आनंदाने भरुन आले होते. संमेलनाचे यश हे माझ्या एकटीचे कार्य नसून, माय मराठी नक्षत्र संघटनेतील प्रत्येक सदस्याने यासाठी जीव ओतला आहे, असे त्यांनी नमूद केले. आणि, संमेलनाच्या यशाचे श्रेय, त्यांनी मोठ्या मनाने, मुक्तपणे सर्वांमध्ये वाटून टाकले. यशस्वी नेतृत्व म्हणजे काय ? ते विजयाताईंच्या आभाराच्या भाषणातून, सर्व उपस्थित जनसमुदायाला समजले.

आपण करत असलेल्या कार्याबद्दल, काही व्यक्ती टिकाही करतील, कुणी आपल्याला चुकीचंही ठरवेल, आपण करत असलेल्या कामात अडथळेही निर्माण करतील. मात्र, याकडे आपण सकारात्मक भावनेनेच बघतो व कुणाबद्दलही मनामध्ये द्वेष ठेवत नाही, ही त्यांची वृत्ती समाजात सकारात्मकता पेरणारी आहे. संमेलनातील विविध सत्रासाठी निवडलेले विषय, यातून त्यांच्या कल्पकतेची जाणिव झाली. तर, दोन दिवसाच्या संमेलनात, त्यांनी वेळेचे काटेकोरपणे केलेल्या पालनातून, त्यांच्यातील कर्तव्यदक्ष अधिकारी व्यक्तिमत्वाचे दर्शन घडविले.

संमेलनात त्यांनी उपस्थित असलेल्या प्रत्येक साहित्यिकाला आणि रसिक श्रोत्यांना, जो मान सन्मान दिला. त्यांची खातिरदारी केली. जो पाहुणचार केला. अगत्याने विचारपूस केली. ती अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या आयोजकांनी अंगीकारावी इतकी मनभावन होती. प्रा. प्रभाकर तांडेकर, विशाल देवतळे आणि भूपेश नेतनराव यांनी नागपूरात पाय ठेवल्यापासून ते संमेलन संपल्यावर आम्ही गाडीत बसेपर्यंत जी आस्थेने व्यवस्था ठेवली, ती आमच्यात एक अनामिक नातं निर्माण करुन गेली. आणि विजया ताईंच्या साहित्याने, विचारांनी मी प्रभावित झालेलोच होतो. परंतु, या संमेलनाच्या निमित्ताने मला त्यांच्यातील कार्यकर्त्याचे प्रत्यक्ष दर्शन घडले. "उक्ती आणि कृती" हातात हात घालून समन्वयाने चालत असतील, तर किती सुंदर कार्य उभं राहू शकतं याचं उदाहरण म्हणजे विजयाताई मारोतकर आहेत, असं मला वाटतं. त्यांच्या सान्निध्यात घालविलेल्या क्षणांना अत्तराचा सुगंध आला नसता तरच नवल. तो दरवळ पुढील कित्येक दिवस, वर्ष माझ्या मनात रेंगाळत राहील. आणि, त्यांच्यासारखं कार्य आपल्यालाही करता यावं, अशी प्रेरणा देत राहील.

---

आधुनिक केसरी

# मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र !

प्रसाद शिवाजी जोशी

**मा. मुख्यमंत्रीजी...**

प्रदीर्घ कालावधी नंतर आपण राज्यातील जनतेस संबोधित करणार असल्याने राज्याचा एक नागरिक म्हणून मलाही आपल्या भाषनाबाबत उत्सुकता होती. परंतु दुर्दैवाने आपल्यातील पक्षप्रमुखाने राज्याच्या मुख्यमंत्र्यावर मात केली. मुख्यमंत्रीजी, मला अपेक्षा होती की, आपण राज्यातील ऊस प्रश्नाबाबत काही उपाययोजना जाहीर कराल. माझ्या मराठवाडयातील गेवराई मध्ये नामदेव जाधव या शेतकऱ्याने उभ्या ऊसाला आग लावून स्वतःही आत्महत्या केली हो.

राज्यात पुन्हा एकदा भारनियमन सुरु झाले आहे. शेतकऱ्याकडील वीजबिल थकबाकी मुळे वीजपूरवठा खंडित केला जातोय. भरती प्रक्रिया थंडावली आहे. तरुणांची वयं निघून जात आहेत. अशा स्थितीत आपल्याकडून ठोस कृती कार्यक्रमाची अपेक्षा होती. परंतु आपण नेहमी प्रमाणे वेगळाच विषय घेतलात.

**काश्मिरी पंडित राहुल भटची हत्या**

मुख्यमंत्री जी आपण राहुल भट या काश्मिरी पंडिताच्या हत्येबद्दल जाब विचारला. हे मान्यच. देशातील प्रत्येक नागरिकांने काश्मिरी पंडिताच्या अवस्थेबद्दल जाब विचारलाच पाहिजे. परंतु साहेब पालघर मध्ये ज्या निरपराध साधूना ठेचून मारले त्यांचा आरोपीना तर अजून शिक्षा झालेली नाही. अशाप्रसंगी आपल्याला जाब विचारला तर त्याला काय उत्तर देणार?

**रा. स्व. संघ**

आपण राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका केलीत. अहो मुख्यमंत्री जी ज्या मराठी च्या मुद्द्यावर शिवसेना वाढली तोच मुद्दा आपण राजकीय सोयीसाठी विसरता आहात. संघ संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे मराठी माणूस होते आणि महाराष्ट्राच्या मातीत सुरु झालेला संघ आज शतकपूर्ती च्या उंबरठ्यावर आहे. 90 वर्षांनंतर एकदाही न फूट पडलेली ही स्वयंसेवी संघटना आहे. जिचा विस्तार जगभर होत आहे. म्हणून जगातील सर्वात मोठी स्वयं सेवी संघटना आहे.

विवाह करून स्वतःचा संसार, सत्ता, पैसा आणि प्रसिद्धी सारख्या कुठल्याही बंधनात न अडकता केवळ राष्ट्रहितासाठी हजारो युवक पूर्ण वेळ प्रचारक म्हणून कार्य करतात ही सहज, सोपी बाब नाही. आजही केरळ, बंगाल सारख्या ठिकाणी प्रचारकांची हत्या होते. असे ध्येयवादी मनुष्य निर्माण करणे हे संघाचे कार्य आहे. राहिला प्रश्न स्वातंत्र्य संग्राम आणि संघाच्या सहभागाचा. स्वातंत्र्य आंदोलनाच्या वेळी टाटा सारखे उद्योगपती, आगरकर, महात्मा फुले यांच्यासारखे समाजसुधारक किंवा संत महात्मे कीर्तनकार हे आपल्याला क्षेत्रात राष्ट्रहित, समाज हिताचे कार्य करत होते. त्यांनी महात्मा गांधी यांच्या अहिंसात्मक किंवा भगतसिंग सुखदेव राजगुरू यांच्यासारख्या सशस्त्र स्वातंत्र्य लढ्यात सहभाग नोंदवला नाही म्हणून त्यांनी केलेले कार्य नाकारून तुम्ही स्वातंत्र्य लढ्यात सहभागी नव्हता अशी दुषणे द्यायची का?

**सुसंस्कृतपणा**

**मा. मुख्यमंत्रीजी,**

केतकी चितळे प्रकरणावरून आपण सुसंस्कृतपणाबद्दल आग्रहाने सांगितले. तसेच कुणाच्या शारीरिक व्यंगावर टिकटिप्पणी करणे चुकीचे आहे असेही बोललात. हे मान्यच. संजय राऊत साहेब बाजूला असताना आपण हे बोललात हे फार बरे झाले. कारण त्यांनी अलीकडे जाहीररित्या च्युतिया, एडझवे सारखे असंसदिय शब्द उच्चारले. तसेच आपल्याच भाषणात आपण देवेंद्र फडणवीस यांच्या वजनाबद्दल व किरीट सोमय्या यांच्या तोतरे बोलण्याबद्दल टीकाटिप्पणी केलीत. आपणच आपले मार्गदर्शन चुकीचे ठरवावे हे खटकले.

**रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी**

मा. मुख्यमंत्री जी आपण अगदीच अनाहुत पणे असेल किंबहुना जाणीवपूर्वक असेल परंतु रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी चा उल्लेख केलात. संपूर्ण राज्यातच नव्हे तर देशात राजकीय कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्याचे कार्य प्रबोधिनी करते. मी स्वतः तिथे एक वर्षभर काम केले आहे. त्यामुळे जबाबदारीने सांगू शकतो की, तिथे राज्यातील सर्वच पक्षाचे नेते व कार्यकर्ते येऊन गेलेले आहेत. प्रमोद महाजन जी यांनी अतिशय दूरदृष्टीने प्रबोधिनीची उभारणी केली आहे. फक्त भाजपच्याच कार्यकर्त्यांना इथे प्रशिक्षण देतात असे नव्हे तर विविध पक्षाचे राजकीय नेते कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, वक्ते, पत्रकार, शिक्षक, कॉरपोरेट्स अशा समाजाच्या विविध क्षेत्रात विधायक कार्य करणाऱ्याना प्रशिक्षण दिले जाते. तसेच स्वयंसेवी संस्था उभारणी, CSR, प्रकल्प कार्य यांसारख्या वेगवेगळ्या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम होतात.

आपल्या माहिती साठी सांगावेसे वाटते की, यात कुठलाही खंड पडला नाही उलट विस्तारच होत गेला आहे. प्रबोधिनीच्या अध्यक्षपदी नुकतीच देवेंद्र फडणवीसजी यांची निवड झाली असून ज्यांचा आपण उल्लेख केलात ते खा. विनय सहस्त्रबुद्धे हे सध्या प्रबोधिनीचे उपाध्यक्ष आहेत. रवींद्र साठे हे महासंचालक आहेत. मला असे वाटते की, आपणही कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणारी संस्था उभारावी. संजय राऊत साहेबांवर ही जबाबदारी दिल्यास ते उत्तमपणे पार पाडतील अशीही मला खात्री आहे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, राज्यात अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. ऊस, वीज, नोकरभरती यावर आपण ठोस कृती कार्यक्रम अंमलात आणावा.

# डॉक्टरांचा हलगर्जीपणा; प्रसुतीदरम्यान महिलेचा बाळासह मृत्यू

## डॉक्टरांवर गुन्हा दाखल झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात न घेण्याचा नातेवाईकांचा पवित्रा, शहरातील जाजू हॉस्पिटलमधील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** सतत वादग्रस्त ठरलेल्या येथील जाजू हॉस्पिटलमध्ये प्रसूतीसाठी दाखल झालेल्या महिलेचा व बाळाचा प्रसुती दरम्यान मृत्यू झाला. दरम्यान संतप्त मृत महिलेच्या नातेवाईकांनी डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे ही घटना घडली असल्याचा आरोप करत संबंधित डॉक्टरांवर गुन्हा दाखल झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेण्यार नसल्याचा पवित्रा घेतला. ही घटना सोमवार दि.१६ रोजी पहाटे ६:३० वाजण्याच्या दरम्यान घडली.

सोनाली पवन गायकवाड वय २२ वर्षे राहणार खेर्डा खुर्द या महिलेचे गतवर्षी मे महिन्यात विवाह झाला होता. सध्या ती माहेरी बाळंतपणासाठी चिंचोली येथे आली होती. दरम्यान बाळंत मुलीची संपूर्ण ट्रीटमेंट माजलगाव शहरातील जाजू हॉस्पिटल येथे सुरू होती.वडील मोकिंदा मुंजाबा काळे यांनी तिला प्रसूती कळा होत असल्याने जाजू हॉस्पिटलमध्ये रविवार दि.१५ रोजी सायंकाळी दाखल केले. सोमवारी पहाटे तिला प्रसूती वेदना जास्त होत असल्याने नातेवाईकांनी डॉक्टरांना लक्ष देण्याची विनंती केली. त्यावर डॉक्टरांनी चिडचिड करत नातेवाईकांना उद्दामपणे वागणूक दिली असल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे.




वेळ पडली तर सिजर करा, मुलीचा त्रास पाहून नातेवाईक डॉक्टरांना विनंती करत होते. परंतु डॉक्टरांनी त्याकडं दुर्लक्ष केले. त्यातच ६ वाजून २२ मिनिटांनी तिची प्रसूती होऊन मुलगा झाला. परंतु प्रसूती दरम्यानच रक्त थांबत नसल्याने बाळाचा मृत्यू झाला. तर बाळंत महिलेची प्रकृती बिघडली. यावेळी डॉक्टरांनी तिला दुसऱ्या हॉस्पिटलकडे हलविण्यास सांगितले.

दरम्यान यशवंत हॉस्पिटलकडे नेत असताना महिलेचा ७ वाजून ४५ मिनिटांनी मृत्यू झाला. बाळासह महिलेच्या दोन्ही मृत्यूस डॉक्टर विजयकुमार जाजू व डॉक्टर उर्मिला जाजू हे डॉक्टर दाम्पत्य जबाबदार असल्याचा आरोप नातेवाईकांनी करत दोन्ही मृतदेह जाजू हॉस्पिटलमध्ये आणून ठेवले. या दोन डॉक्टरांवर गुन्हा दाखल झाल्याशिवाय मृतदेह हलवणार नसल्याचा पवित्रा नातेवाइकांनी घेतला.

नातेवाईकांचा मोठा जमाव हॉस्पिटल समोर जमा झाला होता.

यावेळी घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी नातेवाईकाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. नातेवाइकांनी पोलिस स्टेशन समोरही गुन्हा दाखल करण्यासाठी गर्दी केली होती. दरम्यान पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी समजून सांगून दोन्ही मृतदेह तपासणीवर शवविच्छेदनासाठी अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात पाठवले. दरम्यान प्राप्त अहवालानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया होईल असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

### जाजू हॉस्पिटल आणि वादग्रस्त घटना

**अनेक गंभीर घटनांमुळे येथील जाजू हॉस्पिटल हे वादग्रस्त व सतत चर्चेत ऐकायला मिळत आले आहे. यापूर्वीही अनेक वेळेस बाळंत महिलेचे व बाळांचे मृत्यू डॉक्टर दाम्पत्याच्या हलगर्जीपणातून झाल्याच्या घटना घडल्या असल्याची माहिती आहे. तर गर्भपात केल्याचीही चर्चा ऐकायला येते. चुकीचे निदान करून जास्तीत जास्त वेळ रुग्णांच्या नातेवाईकांकडून पैसे याठिकाणी वसूल केल्या जात असल्याच्या नातेवाईकाच्या प्रतिक्रिया आहेत.**

### जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.साबळे यांनी दखल घेण्याची मागणी

**जिल्ह्यात वैद्यकीय कारभार सुतासारखे सरळ करणारे जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर सुरेश साबळे यांनी या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून जाजू हॉस्पिटलमधील अनागोंदी कारभारावर लक्ष घालावे व पिडीत कुटुंबाला न्याय देण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.**

# वेकोली, एसबीआय पदभरतीच्या कोट्यवधींच्या रॅकेटचा भंडाफोड

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वेकोली, एसबीआय आणि रेल्वेमध्ये नोकरी देण्याच्या नावाखाली शेकडो बेरोजगारांची फसवणूक करणाऱ्या आंतरराज्यीय रॅकेटचा नागपूर ग्रामीण पोलिसांनी भांडाफोड केला आहे. या टोळीने नोकरीचे आमिष दाखवत बेरोजगारांची कोट्यवधी रुपयांनी फसवणूक केली. या टोळीतील शिल्पा राजीव पालपर्ती, कुंदन कुमार उर्फ राहुल सिंग उर्फ रमेश शर्मा (३४, पाटणा), मोहम्मद दानिश झिशान आलम उर्फ रशीद अन्वर आलम (वय ३५, रा. पाटणा, सुलतानगंज) यांना अटक करण्यात आली आहे. परंतु अद्यापही मुख्य सूत्रधार हाती लागलेला नाही.

पोलीस अधीक्षक (ग्रामीण) विजय मगर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र निकम यांनी पत्रपरिषदेत ही माहिती दिली. सावनेर येथील खुरजगाव येथील सतीश प्रकाश आडे (३०) यांच्या तक्रारीनुसार २६ जुलै २०२१ रोजी आरोपी अमित कोवे, शिल्पा पालपर्ती आणि रमेश कामोने यांनी वेकोली किंवा एसबीआय बँकेत नोकरी लावून देण्याच्या बहाण्याने त्यांच्या पत्नीची ११ लाख १७ हजारांनी फसवणूक केली.

**आमिषाला विदर्भातील तरुण पडले बळी**

केळवद पोलिसांनी १ जानेवारी २०२२ रोजी आरोपीविरुद्ध फसवणुकीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. या प्रकरणाच्या तपासादरम्यान, सुरेंद्रगड येथील रहिवासी व आरोपी अमित कोवे याने जानेवारी २०२२ रोजी धंतोली येथील पत्रकार भवनाजवळ विष पिऊन आत्महत्या केली होती. मोबाइलचा तपास केला असता, त्याने नागपूर शहरासह ग्रामीण, गोंदिया, भंडारा, अमरावती, वर्धा येथील अनेक तरुणांकडून नोकरीसाठी लाखो रुपये घेतल्याचे निष्पन्न झाले. यासोबतच २०१९ पासून पाटणा येथील कुंदन व मोहम्मद दानिशला १ कोटी ३० लाखांची रक्कम दिल्याची माहितीदेखील समोर आली.

**तिघांना अटक, सूत्रधार पसार**

या दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक करून सावनेर न्यायालयात हजर केले. १२ दिवसांच्या पोलीस कोठडीनंतर आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली आहे. या दोघांविरुद्ध अजनी पोलीस ठाण्यात देखील गुन्हा दाखल आहे. तर आरोपी महिला शिल्पाविरुद्ध हुडकेश्वर, नांदेडमधील शिवाजीनगर आणि सांगलीतील मिरज पोलीस ठाण्यात फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. पोलीस अधीक्षक मगर यांनी आरोपींना बळी पडलेल्या नागरिकांनी ग्रामीण पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

**कोवे होता सामाजिक कार्यकर्ता**

या प्रकरणातील आरोपी कोवे याच्या व्हायरल झालेल्या सुसाईड नोटनुसार ही टोळी सुशिक्षित बेरोजगार तरुणांना टार्गेट करून वेकोली, रेल्वे आणि एसबीआय बँकेत नोकरी मिळवून देण्याचे दावे करायची. या टोळीचे जाळे नागपूर, विदर्भासह पाटण्यापर्यंत पसरल्याची माहिती सुसाईड नोटमध्ये आढळून आली. सामाजिक कार्यकर्ता असलेल्या अमित कोवेला आदिवासी सेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. यादरम्यान, संबंधित टोळीने कोवेला त्यांच्यात समाविष्ट केले असल्याची चर्चा आहे. कोवेने आपल्या सुसाईड नोटमध्ये आरोपी रशीद आलम (५०), कुंदन कुमार उर्फ राहुल सिंग (४५) यांच्यासह कथित रेल्वे अधिकारी तिवारी (५५), खुराना (५०), शिल्पा पालपर्ती (४०), गडचिरोलीतील तुपट (४५), सकतेल (४५), नागपुरे (४५), कोचे (३५) यांची नावे नमूद केली होती.



# सावळदबारा येथे वन परिमंडळातर्फे बुद्ध पौर्णिमेला वन्य प्राण्यांची गणना

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा, टिटवी व पळसखेडा दरवर्षी प्रमाणे बुद्ध पौर्णिमा ,वैशाख पौर्णिमेला वन्य प्राण्यांची गणना केली जाते असेच या वर्षी सुद्धा दिनांक १६/५/२०२२ रोजी सायंकाळी ४ ते सकाळी आठ वाजण्याच्या दरम्यान वन्य प्रान्यांची गणना करण्यात आली.

यावेळेस सावळदबारा साठवण तलाव, पाझर तलाव या ठिकाणी गस्त घालुन अजिंठा वनपरिक्षेत्र विभाग वन परिमंडळ सावळदबारा येथील वन विभागाचे कर्मचारी अधीकारी यांच्याकडुन हे निरीक्षण करण्यात आले. या बुद्ध पौर्णिमेला दि.१६ रोजी वन परिक्षेत्र अधीकारी एन.जे. सोनवणे अजिंठा यांच्या मार्गदर्शनाखाली निसर्गानुभव २०२२ निरीक्षण करण्यात आले. यात सावळदबारा वन परिमंडळातील नियत क्षेत्र सावळदबारा, देव्हारी, टिटवी, पळसखेडा आणि मुर्ती या क्षेत्रामधे वन्य प्रान्यांची गणना सायंकाळी ४ ते सकाळी ८ वाजेपर्यंतच्या वेळेत ही गणना करण्यात आली. यात जंगलातील विवीध प्राणी दिसुन आले. जसे निलगाय, हरिण, रानडुक्कर, ससा, मोर, रान मांजर, लांडगे, कोल्हे हे वन्य प्राणी दिसून आले. यावेळी वन परिमंडळ अधीकारी अविनाश राठोड, वनरक्षक चाथे, वनरक्षक खर्डे, नन्नावरे, वाघ, राठोड, वन मजुर, युसुफ पठाण, आंबादास सुर्यवंशी, महाकाळ यांनी निरीक्षण केले.

# औरंगाबादच्या बापुनगरात स्वरमयी नक्षत्र बुद्ध पहाट

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पहाटेचा दिवाळी पहाट, बुद्ध पहाट सांस्कृतिक कार्यक्रम करण्याची ही तशी प्रस्थापित अभिजन वर्गाची ओळख. मात्र भारतीय कम्युनिस्ट पक्ष खोकडपुरा शाखेतर्फे बापु नगर या झोपडपट्टीत पहिल्यांदाच कलाकारांच्या एकापेक्षा एक सरस आणि सुरेल गीतांची बुध्द पहाट बुध्द पौर्णिमेच्या निमित्ताने रंगली. डॉ. समाधान इंगळे प्रस्तुत नक्षत्र सांस्कृतिक मंच यांचा बुद्ध पहाट हा बुध्द - भीम गीतांचा आगळावेगळा कार्यक्रम संबोधी बौद्ध विहारात संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी अतिशय उत्साहात तयारी करण्यात आली होती. बुद्ध वंदना किंवा खिरदान पर्यंत सिमीत असलेली बुद्ध पोर्णिमा यावर्षी बापूनगरवासी नागरिकांनी बुद्ध पहाट कार्यक्रमाने साजरी केली. पहाटे साडेपाच वाजता कार्यक्रम असल्याने तयारीसाठी संयोजकांनी अतिशय उत्साहाने रात्रीच पूर्वतयारी केली होती. सहभागी कलाकार गायक संदीप चाबुकस्वार, गायिका प्रिया पवार, ढोलक वादक जितेंद्र साळवी, सिंथेसाइझर वादक संतोष खंडागळे, आक्टोपॅड वादक विनोद वाव्हळ, गायक संतोष गायकवाड, अमरजीत बाहेती, अनुराधा कांबळे, नभा इंगळे यांनी एकाहून एक सरस गीते सादर केली.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना हार घालुन करण्यात आली.

'नमस्कार घ्यावा अहो बुद्ध देवा' या गीतातून संदीप चाबुकस्वार यांनी वातावरण चैतन्यमय बनवले तर 'श्री बुद्धाच्या चरणावरती विजयादशमी दिनी' या गीताने प्रिया पवार यांनी उपस्थितांनी ठेका धरायला भाग पाडले. 'जीवनातल्या मंदीरी बांधा पुजा समतेची अनुसरा शिकवण बुद्धाची' या गीताला श्रोत्यांनी भरभरून दाद दिली. 'बुद्ध देवा तुझी ज्ञानगंगा मार्ग दावी आम्हाला प्रसंगा' या गाण्यातून अमरजीत बाहेती यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. 'उध्दार दिन दलितांचा करण्यासाठी भीमराव जन्मले भीमाई तव पोटी' या अनुराधा कांबळे यांच्या गीताने रंगत आणली. छोटी गायिका नभा इंगळे ने सादर केलेल्या 'चांदण्याची छाया कापराची काया माऊलीची माया होता माझा भीमराया' या वामनदादांच्या गीताला श्रोत्यांनी बक्षीसांच्या रूपाने दाद दिली.

श्रोत्यांच्या फर्माईश सादर करताना डॉ. समाधान इंगळे यांनी 'दोनच राजे इथे गाजले कोकण पुण्य भूमीवर' हे गीत तर संतोष गायकवाड यांनी 'पहा पहा मंजुळा हा माझा भीम रायाचा मळा' या गीतांनी विशेष प्रतिसाद मिळवला. 'भीमराज की बेटी मै तो जयभीम वाली हूँ', 'आम्ही भीमाचे गोंधळी' या गीतावर उपस्थितांनी ठेका धरला होता. सकाळी साडेपाच वाजेपासून सुरू झालेली हा संगीतमय बुध्द पहाट कार्यक्रम तब्बल तीन तास चालला. यावेळी नक्षत्र बुध्द पहाट कार्यक्रमाचे संयोजक ॲड.अभय टाकसाळ यांनी कलाकारांचे स्वागत कार्यक्रमाचा उद्देश सांगितला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. राजू हिवराळे, शाखा सचिव कॉ. मनिषा भोळे, शाखा सहसचिव कॉ. अनिता हिवराळे, पुष्पाबाई बिरारे, शालुबाई कांबळे, अजय होर्शिल, पवन अंभोरे, संदीप पेढे, माधुरी जमधडे, चंदाबाई आराक, बाबुलाल वाघ आदींनी परिश्रम घेतले. यावेळी ज्येष्ठ कम्युनिस्ट कार्यकर्त्या कॉ. लिलाबाई टाकसाळ, ज्येष्ठ नेते कॉ. प्रा. राम बाहेती, आदींची उपस्थिती होती. परिसरातील नागरिकांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# 18 जून रोजी पुण्यात पदयात्रा; किसानपुत्र पाळणार काळा दिवस

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** 18 जून 1951 रोजी झालेल्या घटना बिघाडा मुळे शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची पाळी आली आहे. परिशोषत-9 मुळे शेतकरी गुलाम झाला आहे. त्याचा निषेध करण्यासाठी 18 जून रोजी शेतकरी पारतंत्र्य अर्थात काळा दिवस पाळला जातो. या वर्षी पुण्यात किसानपुत्रांची एक पदयात्रा काढली जाणार आहे, त्यात स्वातंत्रतावादी शेतकरी नेते ललित बहाळे, रघुनाथ दादा पाटील, अनिल घनवट, विनय हर्डीकर व अमर हबीब आदी सहभागी होणार आहेत.

किसानपुत्रांनी या पदयात्रेत सहभागी होऊन शेतकरी स्वातंत्र्याच्या लढाईला हातभार लावावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**१८ जून- शेतकरी पारतंत्र्य दिवस का?**

माणसाचा जगण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकारात येतो, हे युनोने आणि संपूर्ण जगाने मान्य केलेले तत्त्व आहे. मूलभूत अधिकार म्हणजे जगण्याचे निसर्गदत्त अधिकार. जगण्याच्या अधिकाराचा संकोच कोणत्याही शक्तीला करता येत नाही असा त्याचा अर्थ. कारण सरकार अथवा मानवनिर्मित कोणतीही शक्ती असो, ती निसर्गापेक्षा मोठी नसते. थोडक्यात काय तर, माणसाचे जगणे निसर्गदत्त अधिकारात मोडते. म्हणूनच माणसाला जगण्यासाठी कोणताही व्यवसाय करण्याचे, कोणताही व्यापार करण्याचे, वस्तूंची देवघेव करण्याचे, सेवांची देवघेव करण्याचे, देशाच्या कोणत्याही भागात स्थलांतर करण्याचे स्वातंत्र्य निसर्गतः मिळाले आहे. जगातील विकसित देशांतील सरकारांनी ते तत्त्व मान्य केले आहे. किंबहुना, त्यांनी ते मान्य केल्यामुळेच ते विकसित देशांच्या पंगतीत जाऊन बसू शकले.

**भारतात काय झाले ?**

इंग्रज गेल्यानंतर हजारो राजे राजवाड्यांच्या कहारातून मुक्त झालेले नागरिक स्वतंत्र आणि सार्वभौम लोकशाही देशाचे नागरिक झाले. देशातील सरकार म्हणजे लोकांचे सरकार असेल असे त्यावेळी उच्चरवाने सांगितले गेले. राज्य कारभार कसा चालेल. राज्य सत्तेच्या कोणत्या मर्यादा राहतील हे ठरविण्यासाठी संविधान तयार करण्यात आले. संविधानाच्या चौकटीतच कायदे करण्याचे अधिकार निवडून येणाऱ्या सरकारांना देण्यात आले. म्हणजे संविधानानेच सरकारांना त्यांची मर्यादा घालून दिली होती. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा संकोच करू नये, असे स्पष्ट निर्देश (अनुच्छेद- १३) मूळ संविधानात दिले होते. तरीही त्या संवैधानिक मर्यादेची तमा न बाळगता, तिचा भंग करण्यात आला. २६ जानेवारी १९५० रोजी संविधानाचा स्वीकार केला आणि अवघ्या दीड वर्षातच म्हणजे, १८ जून १९५१ या दिवशी पहिला घटनाबिघाड करून अनुच्छेद ३१- बी अंतर्गत, मुळात आठ परिशिष्टे असलेल्या राज्यघटनेला नऊवे परिशिष्ट जोडण्यात आले. विशेष म्हणजे ज्या सरकारवर संविधानाच्या रक्षणाची जबाबदारी टाकण्यात आली होती, त्याच सरकारने त्याची मोडतोड केली. त्या पहिल्या घटनाबिघाडाने भारतातील तमाम शेतकऱ्यांना परतंत्र्यात टाकले. त्यांचा मूलभूत अधिकार दडपण्यात आला. म्हणूनच आपण १८ जून हा दिवस शेतकरी पारतंत्र्य दिवस, अर्थात काळा दिवस म्हणून त्याचा निषेध व्यक्त करत असतो.

**माणूसपण नाकारले**

**परिशिष्ट-९ म्हणजे आहे तरी काय?**

या परिशिष्टात एक तरतूद करण्यात आली आहे, तीत स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, या परिशिष्टात ज्या कायद्याचा समावेश केला जाईल त्या कायद्याच्या विरोधात देशातील कोणत्याही न्यायालयात न्याय मागता येणार नाही. म्हणजे त्यांना न्याय नाकारण्यात आला. आज घडीला या परिशिष्ट-9 मध्ये २८४ च्या कायदे आहेत त्यातील २५० पेक्षा अधिक कायदे शेतकऱ्यांच्या आणि शेतीच्या संबंधातील आहेत. यात शेतजमीन धारणा कायदा, अत्यावश्यक वस्तूंचा कायदा आणि जमीन अधिग्रहण कायदा असे शेती व्यवसायाचे अधिकार काढून घेणारे प्रमुख कायदे आहेत. या तीन कायद्यांनी शेतकऱ्यांना बंधनात जखडून टाकले आहे. म्हणजे परिशिष्ट-९ हे भारतातील शेतकऱ्यांच्या जगण्याचा मूलभूत अधिकार नाकारणारे परिशिष्ट आहे. अर्थात ते शेतकऱ्यांचे व्यक्तित्व नाकारणारे आहे. त्यांना गुलाम करणारे आहे.

**जगण्याचा अधिकार नाकारला**

लोकसंख्येचा विचार केला तर काय दिसेल? पंधरा कोटी शेतकरी खातेदार, त्यांचे सरासरी प्रत्येकी पाच सदस्य, म्हणजे पंचाहत्तर कोटी शेतकरी. पंचाहत्तर कोटी शेतकऱ्यांना भारतात जगण्याचा मूलभूत अधिकारच नाकारला गेला आहे. देशातील अर्ध्याअधिक लोकसंख्येला जगण्याचे स्वातंत्र्य नाकारणारा जगातील आपला एकमेव देश असावा. शेतकरीविरोधी नरभक्षी कायदे व त्या कायद्यांना संरक्षण देणारे परिशिष्ट ९ यामुळेच लाखो शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागल्या आहेत.

**विषारी सापांचे वारूळ**

परिशिष्ट-९ हे विषारी सापांचे वारूळ आहे ज्यात शेतजमीन धारणा कायदा, अत्यावश्यक वस्तू कायदा आणि जमीन अधिग्रहण कायद्यासारखे विषारी सापांचे वास्तव्य आहे. हे साप मारण्यासाठी, हे विषारी सापांचे वास्तव्य असलेले वारूळ उध्वस्त करणे गरजेचे आहे.

**१८ जून रोजी पुण्यात पदयात्रा**

किसानपुत्र आंदोलन दर वर्षी १८ जून हा दिवस, शेतकरी पारतंत्र्य दिवस अर्थात काळा दिवस पाळत असते. दंडावर किंवा छातीवर काळी फीत लावणे, घरावर काळा ध्वज लावणे अशा प्रकारे काळा दिवस पाळला जातो. या वर्षीही जागोजागी किसानपुत्र आपापल्या परीने निषेध व्यक्त करणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून येत्या १८ जून २०२२ या दिवशी पुण्यात एक पदयात्रा निघणार आहे. पुणे स्टेशन येथील महात्मा गांधी पुतळ्यापासून निघणारी ही पदयात्रा महात्मा फुले वाड्यापर्यंत जाईल आणि तिथे समारोप करण्यात येईल.

या पदयात्रेत स्वतंत्रतावादी शेतकरी नेते ललित बहाळे (अध्यक्ष शेतकरी संघटना) अनिल घनवट (माजी अध्यक्ष, शेतकरी संघटना व राष्ट्रीय अध्यक्ष स्व.भा.पा.), रघुनाथ दादा पाटील (अध्यक्ष, शेतकरी संघटना), विनय हर्डीकर (विचारवंत व भारत-इंडिया फोरमचे मार्गदर्शक) आणि अमर हबीब (किसानपुत्र आंदोलन) हे सहभागी होणार आहेत. तुम्हीही या पदयात्रेत सहभागी होऊन शेतकरी स्वातंत्र्याच्या लढाईत सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रसिद्ध नाटककार प्रभाकर दुपारे लिखित बौद्ध परिषदेत रमाईचे भावपूर्ण सादरीकरण




आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** डॉ.बी.आर.ए. लॉ कॉलेज येथे बुद्ध पोर्णिमेच्या पूर्वसंध्येवर बौद्ध परिषदेचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या परिषदेत सायंकाळी सध्या संपूर्ण देशात गाजत असलेल्या रमाई या नाटकाच्या भावपूर्ण सादरीकरणाने उपस्थित शेकडो प्रेक्षकांचे डोळे पाणावले. प्राची दाणी यांनी रमाईची भूमिका अतिशय ताकदीने साकारली. या नाटकाचे प्रयोग सध्या विदर्भात सुरू असून रंगभूमीच्या चळवळीत या नाटकाने आपले आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे. प्रसिद्ध नाटककार प्रभाकर दुपारे लिखित या नाटकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाईच्या जीवनाचे भावविश्व उलगडण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. शंकर शंखपाळे यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले आहे.

प्रयोगाच्यावेळी सिनेसृष्टीतील विख्यात कलावंत फिरदोस सराफ, लॉ कॉलेजचे संचालक डॉ. सच्चिदानंद फुलेकर, विद्या फुलेकर व मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. या नाटकाचे शेकडो प्रयोग विदर्भातील प्रत्येक शाळेत आयोजित करण्याचा मनोदाय फुलेकर यांनी व्यक्त केला. तर मुंबईच्या सिने सृष्टीत विदर्भातील कलावंतांना संधी देण्याचे आश्वासन सराफ यांनी दिले.

## मुंबई -आग्रा राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघातात तिघे जागीच ठार

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील पुरमेपाडा शिवारात भीषण अपघात झाला. त्यात तीन जण जागीच ठार तर नऊ जण जखमी झाले आहेत. मृत व जखमी हे तरडी (ता. पारोळा, जि. जळगाव) येथील रहिवासी आहेत.

पुरमेपाडा शिवारात ट्रक, रिक्षा आणि क्रुझर या तीन वाहनांमध्ये विचित्र अपघात झाला. रात्री 11.30 वाजेच्या दरम्यान हा अपघात झाला. या भीषण अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला तर 9 जण जखमी झाले आहेत. मृतांपैकी रिक्षा चालक बराच वेळ ट्रकखाली तसाच अडकून होता. रात्री उशिरापर्यंत अडकलेल्या रिक्षा चालकाला क्रेनच्या सहाय्याने काढण्याचे पोलीस प्रशासनाकडून शर्तीचे प्रयत्न करण्यात आले. तर जखमींना जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

DON'T NEGLECT YOUR HEALTH
HEALTH IS WEALTH
A TRUSTED SUPAR MARKET IN CITY

MAHAVIR
GHAR SANSAR
• Wholesale & Retail
• Kirana, Dry Fruits, Spices
• Crockery, Home Appliances
• Home Cleaning Material, Steel & Aluminium
• Plastic Items & Many More
Sumit 7620111118
Rajesh Jain 758834738
Ramesh Jain (Crockery) 9860481142 7620111117
Whatsapp Order & Any Order 9850017181
Delivery Status 9021395308 9657398232
Wholesale Enquiry 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. Road, Chelipura, Shahgunj, Aurangabad
Plot No. A25, Opp MIDC Police Station MIDC Chikalthana, Aurangabad


SP
SP Entertainer
Singers Pride | Heart to Heart Music
@ Musical Events @ Stage Shows
@ Party / Functiones
Track Showes + LED Wall
Marathi - Hindi old & new Songs
Ghuzales, Bhajans / Natya Geet
Singing Classes on Karaoke Track
You Can Start your Own Business

S.P. Deshpande
Shant Prabha 120, TilakNagar,
Aurangabad, 9730527669

# ज्या देशातील शेतकरी सुखी तोच देश सुखी : प्रवीण तरडे

## आगामी सरसेनापती हंबीरराव मोहिते हा मराठीतील सर्वाधिक खर्चिक चित्रपट, प्रविण तरडे यांचा दिशा कार्यगौरव पुरस्काराने सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी, पुणे :** ज्या देशातील शेतकरी वर्ग सुखी असेल तोच देश निश्चितपणे सुखी असेल. जर शेतकरीच दु:खी राहिला तर तो देश सुखी असू शकत नाही, असे स्पष्ट मत प्रसिध्द अभिनेता, लेखक, दिग्दर्शक प्रविण तरडे यांनी चिंचवड येथे बोलताना व्यक्त केले. सरसेनापती हंबीरराव मोहिते हा आगामी मराठी चित्रपट हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटांच्या तोडीस तोड असून मराठीतील सर्वाधिक खर्चिक चित्रपट झाला आहे, असेही ते म्हणाले.

दिशा सोशल फाऊंडेशनच्या वतीने चिंचवड येथे खासदार श्रीरंग बारणे व आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते तरडे यांचा 'दिशा कार्यगौरव' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यानंतर, मुलाखतकार विनोद सातव यांनी घेतलेल्या प्रकट मुलाखतीत ते बोलत होते. दीड तास चाललेल्या या मुलाखतीच्या माध्यमातून तरडे यांचा जीवनपट उलगडण्यात आला. 'देऊळबंद', 'मुळशी पॅटर्न', 'धर्मवीर आनंद दिघे' व 'सरसेनापती हंबीरराव मोहिते' या त्यांच्या चित्रपटांविषयी तरडे यांनी पडद्यामागचे अनेक किस्से दिलखुलासपणे सांगितले. शेती, प्रतिकूल परिस्थितील शेतकऱ्यांचे जगणे, राजकारण, मराठी चित्रपट क्षेत्र, महाराष्ट्राची थोर ऐतिहासिक परंपरा अशा विविध विषयांवर तरडे यांनी परखड मते मांडली. यावेळी व्यासपीठावर अभिनेते रमेश परदेशी, दिशा फाऊंडेशनचे अध्यक्ष नाना शिवले, कार्याध्यक्ष राजू करपे, उपाध्यक्ष संतोष बाबर, माजी अध्यक्ष गोरख भालेकर, सचिन साठे, संतोष निंबाळकर, नंदकुमार कांबळे उपस्थित होते.



उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल गोरख भालेकर व सचिन साठे यांचा तर करोना योध्दा म्हणून संतोष चांदेरे यांना तरडे यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

तरडे म्हणाले की, आतापर्यंत मी साडेचार हजार पेक्षा जास्त पुस्तके वाचली आहेत. संवाद कौशल्य हे सामाजिक आणि भौगोलिक आयुष्य कसं आहे यावर अवलंबून आहे. त्यामुळे माझ्या चित्रपटातील संवाद मला उस्फूर्तपणे सुचतात. माझ्या चित्रपटात मी शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न तळमळीने मांडत आलो आहे. सलमान खानने केलेल्या हिंदी चित्रपटासह मुळशी पॅटर्नचा भारतातील सोळा भाषांमध्ये रिमेक करण्यात आला आहे. येत्या २७ मे ला प्रदर्शित होणाऱ्या हंबीररावसाठी सर्वार्थाने खूप मेहनत घेतली आहे. आतापर्यंतच्या मराठी चित्रपटात सर्वाधिक खर्चाचा आणि मराठी चित्रपटाची दिशा बदलून टाकणारा हा सिनेमा ठरणार आहे. दाक्षिणात्य प्रेक्षक तेथील चित्रपटांच्या मागे ठामपणे उभा राहतो. हंबीरराव हा त्यांच्या तोडीचा चित्रपट बनलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या काळात स्वराज्याचे सरसेनापती असलेल्या हंबीरराव मोहिते यांच्या संपूर्ण कुटुंबाची ही गोष्ट आहे. स्वराज्यासाठी ते पूर्ण कुटंब लढाईत उतरले. महिलाही मागे राहिल्या नाहीत.

तरडे म्हणाले, आई वडिलांच्या पुण्याईमुळे शेतकरी, वारकऱ्यांचे विषय मी प्रभावीपणे मांडू शकलो, कारण मी ते जीवन जगतो आहे. मी सर्वप्रथम शेतकरी आहे. सिनेमाच्या माध्यमातून शक्य तितक्या शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या आहेत. यापुढेही शेतकऱ्यांच्या समस्या प्राधान्याने मांडत राहणार आहे. या देशात सगळे मिळेल पण शुद्ध अन्न मिळणार नाही. ते शेतकरीच देऊ शकणार आहे. त्यासाठी शेती विकू नका, व्यसन करू नका, वाईट मार्गाला लागू नका, असा संदेशही तरडे यांनी दिला. आगामी काळात छत्रपती शिवाजी महाराजांचे शेती धोरण समाजापुढे आणायचे आहे. यापूर्वी ते कोणीच सांगितले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य काळात राबवलेली "ऐन जिन्नस शेती कर्ज पद्धत" ही शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकते, असेही ते म्हणाले.

खासदार बारणे म्हणाले की, राजकारणामध्ये जे एरवी एकमेकांची तोंडे पाहत नाहीत, अशा विरोधकांनाही एकत्र आणण्याचे काम आणि समाजाला योग्य दिशा देण्याचे काम दिशा फाउंडेशन करीत आहे. तरडे यांनी त्यांच्या चित्रपटांद्वारे वस्तुस्थिती मांडण्याचे काम केले आहे. त्यामुळेच आतापर्यंतच्या त्यांच्या सर्व कलाकृती यशस्वी ठरल्या आहेत. हंबीरराव देखील उत्तम चित्रपट असेल. आमदार लांडगे म्हणाले की, तरडे यांच्या मुळशी पॅटर्न मधील "जमीन विकायची नसते, तर राखायची असते" या संदेशातून अनेकांना प्रेरणा मिळाली व त्यांनी जमीन विकण्याचा निर्णय बदलला. दिशा सोशल फाउंडेशनच्या विविध उपक्रमांचे लांडगे यांनी कौतुक केले. प्रास्ताविक नाना शिवले, सूत्रसंचालन अविनाश वाळुंज आणि संतोष निंबाळकर यांनी आभार मानले.

# प्रेमिका असताना अप्सरा वाटणारी लग्न होताच पांढऱ्या पायाची म्हणून पतीने केला जाळण्याचा प्रयत्न

## प्रेमविवाहानंतर अडीच महिन्यांत थरकाप उडवणाऱ्या घटनेने बीड जिल्ह्यात खळबळ

आधुनिक केसरी न्यूज

**गेवराई :** प्रेमीका असताना अप्सरा वाटणारी मुलगी लग्न होताच पांढऱ्या पायाची असल्याचा प्रेमवीर पतीला साक्षात्कार झाला. आयुष्यभर सोबत राहण्याचे विसरून 5 लाख बापाकडून घेऊन ये म्हणून पती, सासु, सासऱ्याने तिला जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. प्रेम विवाह झाल्यानंतर अवघ्या अडीच महिन्यांत ही थरकाप उडवणारी घटना तालुक्यातील दिमाखवाडी येथे शनिवार दि.14 रोजी दुपारी घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील दिमाखवाडी येथील एका युवकांचे एका युवतीवर प्रेम जडले तेव्हा प्रेमीका असताना ती अप्सरा वाटत होती. लग्न करणार तर हिच्याशीच असे म्हणत आयुष्यभर सोबत रहाण्याच्या आणाभाका घेतल्या, परंतु कुटुंबातील व्यक्ती लग्नाला विरोध करतील म्हणून दोघेही घरातून पळून गेले. कुटुंबातील व्यक्तींनी शोधून लग्न लावून देतोत म्हणून परत आणले आणि २३ फेब्रुवारी प्रतीक्षा व अजयचे लग्न लावून दिलं. यानंतर महिनाभर चांगले सांभाळलं. यानंतर मात्र पती,सासरा, सासुने प्रतीक्षाला त्रास देण्यास सुरुवात केली. पती नेहमीच तू पांढऱ्या पायाची आहेस म्हणून मारहाण करु लागला. हुंडा म्हणून ५ लाख रुपये घेऊन ये म्हणून तीच्या मागे तगादा लावला. यासाठी नेहमी मानसिक, शारिरीक त्रास देऊ लागले. याच कारणातून शनिवारी (दि.१४) दुपारी १ वाजण्याच्या सुमारास पती अजय सुरेश राजगुडे, सासरा सुरेश शहादेव राजगुडे, सासु संगीता सुरेश राजगुडे यांनी संगनमत करून प्रतीक्षाला जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. परंतु तीने यांच्या तावडीतून सुटका करून घेतली. ज्याच्यावर प्रेम केलं कुटुंबाला विरोध करुन लग्न केले तोच जीवावर उठल्याने प्रतीक्षाने आत्महत्या करण्याचा निर्णय घेत विहीरीच्या दिशेने धाव घेतली. परंतु काही जणांनी आडवून आत्महत्ये पासून रोखले.

यानंतर प्रतीक्षा अजय राजगुडे रा. दिमाखवाडी (ता. गेवराई) हिने पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. त्यावरून पती अजय, सासरा सुरेश राजगुडे, सासु संगीता राजगुडे सर्व रा. दिमाखवाडी (ता.गेवराई) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रेम विवाह असतानाही अवघ्या अडीच महिन्यांत अशी थरकाप उडवणाऱ्या घटनेने हा प्रेम विवाहाच काय होणार? टिकणार की, तुटणार अशी चर्चा करण्यात येत आहे.



# जिद्द आणि प्रामाणिकपणाच्या बळावर नक्कीच यश मिळते : पोलीस अधीक्षक अनिता जमादार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पोलीस भरतीत यश मिळवण्यासाठी गैर मार्गाचा अवलंब न करता जिद्द आणि प्रामाणिक मेहनत केली तर निश्चितच दीर्घकाळ टिकणारे यश मिळेल अशी प्रतिपादन लोहमार्गाच्या पोलीस अधीक्षक अनिता जमादार यांनी केले. पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत यश मिळवलेल्या रेड्डी स्पोर्ट्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्या बोलत होत्या.

रेड्डी स्पोर्ट्स अकॅडमीच्या आजवर ९०० हून अधिक विद्यार्थ्यांची निवड पोलीस व इतर शासकीय सेवेत झालेली असून नुकतेच ४७ विद्यार्थ्यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल पी.ई.एस. शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या सभागृहात त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य पंकज भारसाखळे, कार्यकारी अभियंता भालचंद्र कुलकर्णी, प्राचार्य डॉ.भास्कर साळवे, रेड्डी अकॅडेमिचे भरत रेड्डी, रखमाजी जाधव, मिलिंद बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गरीब विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत नौकरी मिळून देणार्या रेड्डी स्पोर्ट्स अकॅडेमिच्या कार्याचे कौतुक करत पंकज भारसाखळे यांनी त्यांना पूर्णपणे सहकार्य करण्याचे आश्वासित केले. यावेळी रेड्डी स्पोर्ट्स अकॅडमीच्या पोलीस उपनिरीक्षक झालेल्या ४७ विद्यार्थ्यांबरोबरच आंतरराष्ट्रीय खेळाडू व शिवछत्रपती पुरस्कार विजेते स्वप्नील तांगडे आणि तुषार आहेर तसेच एव्हरेस्ट वीर रफिक शेख यांच्या देखील गौरव करण्यात आला. रेड्डी अकॅडमीच्या संचालिका शुभांगी रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली विनोद माने, भिकन आंबे, अभय दंडघवाल, अनिल निळे यांनी कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले तर सूत्रसंचालन अमृत बिराडे यांनी केले.

# अखिल भारतीय जांगीड ब्राह्मण महासभा, दिल्ली यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीचा शपथविधी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अखिल भारतीय जांगीड ब्राह्मण महासभा दिल्ली अंतर्गत महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीचा शपथविधी सोहळा श्री विश्वकर्मा मंदिर औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रीय अध्यक्ष रामपाल शर्मा, सरचिटणीस संवरमल जांगीड, माजी अध्यक्ष रविशंकर शर्मा, आंतरराष्ट्रीय अध्यक्ष अमरराम जांगीड दुबई, महासभेचे मुख्य संरक्षक भंवर लाल कुलारिया, सुरजमल माकड अध्यक्ष सुतार वाडी मुंबई, किशन लाल शर्मा नागपूर प्रसिद्ध उद्योगपती, श्रीमती रेश्मा देवी राज्य अध्यक्ष महिला सेल राज्य विधानसभा, राहुल शर्मा राष्ट्रीय अध्यक्ष युवा सेल, प्रभुदयाल बर्नेला राज्य अध्यक्ष मध्य प्रदेश, संजय हर्षवाल राज्य अध्यक्ष राजस्थान, गिरधारीलाल जांगीड राज्य अध्यक्ष कर्नाटक, मोहनलाल जांगीड राज्य अध्यक्ष गुजरात, मोहनलाल जांगीड राज्य अध्यक्ष जांगीड महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीचा शपथविधी सोहळा संस्थापक प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र लक्ष्मीनारायण जांगीड माजी प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र चंपालाल शर्मा बुलढाणा माजी प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र व समाज बांधवांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

प्रदेशाध्यक्ष रोहिताश जांगीड, सरचिटणीस मदनलाल जांगीड, कोषाध्यक्ष श्यामलाल जांगीड, कार्याध्यक्ष नरसीराम जांगीड लोनाड सातारा, जिल्हाध्यक्ष छोटूलाल जांगीड, संघटनमंत्री प्रकाश जांगीड, रामजीलाल जांगीड, भवानी शंकर जांगीड, मूळच जांगीड, जी दायमा, धर्मेंद्र जांगीड औरंगाबाद व बाहेरून आलेल्या सर्व बांधवांनी औरंगाबादच्या कार्यक्रमाचे चांगलेच कौतुक केले.




# तथागत गौतम बुद्ध जयंती मोठ्या उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** अखिल विश्वाला शांतीचा व समतेचा मार्ग दाखवणारे विश्ववंदनिय तथागत गौतम बुद्ध यांची २५६६ वी जयंती दिनांक १६ मे २०२२ रोजी वैशाखी पोर्णिमेच्या दिनी भारतीय बौद्ध महासभा माजलगांव च्या विद्यमाने सांची बुद्ध विहार डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन केसापूरी वसाहत माजलगांव येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शेकडो बुद्ध उपासक उपासिका बालक बालीका यांच्या उपस्थीतीत छत्रपती संभाजी महाराज चौक ते सांची बुद्ध विहार माजलगांव येथे सकाळी ९ वाजता धम्म रॅली काढून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष गुलाबराव धाईजे यांच्या हस्ते पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आले व तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीचे पूजन करुण अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. संजय बागूल सह धम्म उपासक उपासिकांचे प्रवचने झाली. या कार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे एस.बी. मोरे, कमलताई डोंगरे, गुलाबराव प्रधान, लिलाताई उजगरे, बी.सी. डोंगरे, के.व्ही. साळवे, शामराव वाघमारे, डॉ. दिगंबर बोबडे, वाल्हाबाई टाकणखार, ॲड. राहूल निसर्गंध, विजय साळवे, डॉ. भागवत साळवे, डि.एस. साळवे, शोभाताई भोजने, दयानंद साळवे, वंचीत बहूजन आघाडी चे धम्मानंद साळवे, अंकुश जाधव, क्रांतीसुर्य सेवाभावी संस्थेचे अशोक मगर, अश्विन टाकणखारसह शेकडो बौद्ध उपासक उपासिका व बालक बालीका उपस्थित होते.

# शासकीय विहिरीजवळ अनधिकृत विहीर खोदली

आधुनिक केसरी न्यूज

**दिंद्रुड :** माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे ग्रा.पं.ने पाणीपुरवठ्यासाठी तलावामध्ये विहिर खोदली. याच विहिरीच्या बाजूला अन्य एकाने विहिर खोदल्याने याचा परिणाम ग्रा.पं.च्या पाणी पुरवठ्यावर झाला आहे. याप्रकरणी दोषीविरोधात कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी दिंद्रुडच्या सरपंचासह ग्रा.पं.सदस्यांनी दिंद्रुड पोलिस ठाण्यासमोर आजपासून आमरण उपोषणाला सुरूवात केली आहे.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे पाणी पुरवठा करण्यासाठी धारूर तालुक्यातील चाटगाव तलावाशेजारी शासकीय विहिर खोदण्यात आली. या विहिरीच्या माध्यमातून जवळपास 18 ते 20 हजार लोकसंख्या असलेल्या या गावाला पाणीपुरवठा केला जातो. मात्र या विहिरीशेजारी अनाधिकृतरित्या विहिर खोदकाम सुरू असल्याची तक्रार सरपंचाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केली असून सदर विहिरीचे काम तात्काळ थांबवून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली होती. मात्र याची दखल घेतली नसल्याने आजपासून दिंद्रुड पोलिस ठाण्यासमोर सरपंचासह ग्रा.पं.सदस्यांनी आमरण उपोषणाला सुरूवात केली आहे. दरम्यान शेख मतीन सत्तार यांनी हि अनाधिकृत विहिरी खोदलेली आहे. याप्रकरणी कारवाईची मागणी सरपंच अजय कोमटवार यांच्यासह ग्रा.पं.सदस्यांनी केली आहे.

# औरंगाबाद विमानतळ आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्हावे : उद्योगमंत्री देसाई

## नागरी विमान वाहतूक मंत्र्यांना दिले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मराठवाडयातील पर्यटन व औद्योगिकदृष्टया महत्वाच्या असणाऱ्या औरंगाबाद विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करून विमानतळ आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्हावे, अशी मागणी उद्योग तथा औरंगाबाद जिल्हयाचे पालकमंत्री सुभाष देसाई यांनी नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना आज येथे केली.
राजीव गांधी भवन, या नागरी विमान वाहतूक मंत्रालयामध्ये आज श्री. देसाई यांनी श्री. सिंधिया यांची भेट घेतली. औरंगाबाद विमानतळाचे नामकरण 'छत्रपती संभाजी महाराज विमानतळ' करणे, विमानाच्या फेऱ्या वाढविणे आदी विषयांवर यावेळी सकारात्मक चर्चा झाली. या बाबतचे निवेदनेही देसाई यांनी दिले. यावेळी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराडही उपस्थित होते.

**विमानतळ धावपट्टीचा विस्तार व्हावा**

यावेळी झालेल्या चर्चेत देसाई यांनी सांगितले की, मराठवाडयात अजिंठा -वेरुळ लेण्यांसह विविध पर्यटनस्थळे आहेत. या पर्यटन स्थळांना जपान, कोरिया,अमेरिका आदि देशांतून व वेगवेगळया राज्यांतून तसेच महाराष्ट्रातून मोठया संख्येने पर्यटक भेटी देतात. पर्यटक व प्रवशांचा वाढता ओघ पाहता औरंगाबाद विमानतळाची सद्याची धावपट्टी लहान पडत असून या धावपट्टीच्या विस्ताराची गरज असल्याचे श्री. देसाई यांनी यावेळी अधोरेखित केले. या कामी स्थानिक प्रशासनाकडून आवश्यक जमीन अधिग्रहण करण्यात येईल तसेच पुढील प्रक्रियेसाठी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने हा विषय गतीने पुढे न्यावा व औरंगाबाद विमानतळ आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ करावे, अशी विनंतीही देसाई यांनी केली. राज्यशासनाने जमीन अधिग्रहण करून दिल्यास विमानतळ धावपट्टीचा विषय तत्परतेने पुढे घेवून जावू, असे आश्वासन यावेळी सिंधिया यांनी दिले.

**विमान फेऱ्या वाढविण्यात याव्यात**

पर्यटक व प्रवाशांची वाढती संख्या पाहता औरंगाबाद विमानतळावर विमानांच्या फेऱ्या वाढविण्याची मागणीही देसाई यांनी यावेळी केली. मुख्यत्वे मुंबई-औरंगाबाद शहरांदरम्यान दररोज सकाळी नियमित विमान फेरी सुरु करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. सद्या उभय शहरांमध्ये सायंकाळी विमान फेरी सुरु आहे. तथापि, पर्यटक, उद्योजक आणि प्रवाशांची वाढती गर्दी व मागणी पाहता तातडीने सकाळच्या विमान फेऱ्या सुरु होण्याची आवश्यकता असल्याचे देसाई यांनी नमूद केले. याबाबत लवकरच सकारात्मक तोडगा काढण्यात येणार असल्याचे आश्वासन सिंधिया यांनी दिले.



**'छत्रपती संभाजी महाराज विमानतळ' नामकरणास केंद्राने मंजुरी द्यावी**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या बैठकीत औरंगाबाद विमानतळाचे नामकरण 'छत्रपती संभाजी महाराज विमानतळ' करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच, विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी राज्यशासना हा प्रस्ताव एकमताने मंजूर केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या या प्रस्तावास नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने मान्यता द्यावी, अशी मागणी देसाई यांनी यावेळी केली.
महाराष्ट्रासह देशातील १३ राज्यातून विमानतळांच्या नामकरणाचे प्रस्ताव मंत्रालयाकडे आले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय कॅबिनेटच्या मंजुरीने हा विषय मार्गी लावण्याबाबतचे आश्वासन सिंधिया यांनी यावेळी दिले.
औरंगाबाद विमानतळावर 'छत्रपती संभाजी महाराजां'चा पुर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणीही देसाई यांनी यावेळी केली यास सिंधिया यांनी सकारात्मकता दर्शविली. देसाई यांनी सिंधिया यांना यावेळी, मराठवाडयाची प्रसिध्द शाल आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या एरियल फोटोग्राफीवर आधारित 'महाराष्ट्र देशा' हे पुस्तक भेट स्वरूपात दिले.



## लायन्स क्लबच्या २०२२-२३ वर्षासाठी औरंगाबाद विभागाची कार्यकारिणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३४ एच २ ची २०२२-२३ वर्षासाठी औरंगाबाद विभागाची कार्यकारणी प्रांतपाल ला. पुरुषोत्तम जयपुरिया यांनी मंगळवारी (ता. १७) रोजी जाहीर केली. यामध्ये औरंगाबाद विभागाचे रिजन चेअरपर्सन म्हणून ला. राहुल औसेकर, रिजन सेक्रेटरी म्हणून ला. मोरेश्वर कुलकर्णी व रिजन ॲडमिनिस्ट्रेटर म्हणून ला. जितेंद्र महाजन यांची नियुक्ती करण्यात आली.
औरंगाबाद विभागातील झोन चेअरमन म्हणून ला. चारुलता कुलकर्णी, ला. संजीव गुप्ता, ला. विशाल झंवर, ला. सचिन अग्रवाल, ला. प्रदीप देशपांडे, ला. शेखर देसरडा आणि ला. मनोज गंगवाल यांची निवड झाली आहे.
ला. सतीश देशपांडे, ला. विजय नांदापूरकर, ला. गीतू छाबडा, ला. अतुल घुले, ला. विजय अग्रवाल, ला. नवनीत भारतीया, ला. नारायण उबरहंडे, ला. मैनोदीन सय्यद, ला. विनोद पाटील, ला. प्रसाद पाटणी, ला. नंदकिशोर मंत्री, ला. सौरभ माळी, ला. सुहास कोटेच्या, ला. श्रीकांत जोगदंड, ला. प्रमोद सरकटे, ला. अशोक भालेकर आणि ला. नसीम सैफुद्दीन रहीम या नवनिर्वाचित अध्यक्षांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.
जयपुरिया म्हणाले की, औरंगाबाद विभाग हा सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर भूमिका निभावतो लायन्स परिवारात याची अग्रणी भूमिका उत्तम पणे निभावण्यासाठी औरंगाबाद विभागाचे मार्गदर्शक म्हणून ला. डॉ. नवल मालू, ला. तनसुख झांबड, ला. राजेश राऊत, ला. महावीर पाटणी, ला. विवेक अभ्यंकर, ला. अरविंद माच्छर, ला. संदीप मालू आणि प्रथम उपप्रांतपाल ला. सुनील देसरडा हे योग्य दिशेने सामाजिक कार्य पुढे नेण्यासाठी सदैव प्रयत्न करीत असतात. औरंगाबाद लायन्स परिवाराचे प्रमुख मार्गदर्शक ला. राजेंद्र दर्डा व ला. महावीर पाटणी यांनी सर्व नवीन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

## नागपूर येथे काँग्रेसचे राज्यस्तरीय व राष्ट्रीय सोशल मीडिया शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सोशल मीडिया विभागातर्फे नागपूर येथे 28 व 29 मे रोजी दोन दिवसीय राज्यस्तरीय व राष्ट्रीय "नवसंकल्प सोशल मीडिया शिबिर" आयोजित करण्यात आले आहे.
शनिवारी 28 मे रोजी आयोजित राज्यस्तरीय शिबिरात काँग्रेसच्या सोशल मीडिया विभागाच्या राज्य कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी व जिल्हा स्तरावरील पदाधिकारी सहभागी होतील.
यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोकराव चव्हाण व राज्यातील सन्माननीय मंत्री प्रामुख्याने उपस्थित राहतील.
रविवारी, 29 मे रोजी घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय शिबिरात देशभरातील विविध राज्यांतील काँग्रेस पक्षाचे सोशल मीडिया विभागाचे समन्वयक व प्रमुख पदाधिकारी सहभागी होणार आहेत.
यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे संघटन महासचिव के.सी. वेणुगोपाल, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी सोशल मीडिया विभागाचे प्रमुख रोहण गुप्ता, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व इतर नेते आणि पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित राहतील.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

